**बिसेन डेन्टल केअर**
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे




गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१४ गोंदिया | अंक ३६ | बुधवार,दि.१३ ऑगस्ट २०२५ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027

## ‘मतचोरी’ विरोधात विरोधक एकवटले; ३०० खासदारांचा आयोगावर महामोर्चा





नवी दिल्ली :- निवडणूक प्रक्रियेतील कथित गैरप्रकारांबाबत संसदभवनातून मोर्चाने निवडणूक आयोगाच्या मुख्यालयात निघालेल्या विरोधकांच्या मोर्चाने सोमवारी राजधानीतील वातावरण ढवळून निघाले. खासदारांच्या घोषणाबाजीमुळे संसदेचा परिसर दणाणून गेला होता. पोलिसांनी मोर्चा अडविल्यानंतर खासदारांनी तेथेच ठिय्या देत सरकार आणि निवडणूक आयोगाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

संसदेच्या बाहेर काही अंतरावर असलेल्या परिवहन भवनासमोर पोलिसांनी मोर्चा अडविला. त्यानंतर समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी अडथळे उडी मारून पार केले आणि पोलिसांची नाकाबंदी तोडण्याचा प्रयत्न केला. तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा, काँग्रेसच्या सुष्मिता देव, संजना जाटव, ज्योतिमणी आदी काही खासदारांनी लोखंडी अडथळ्यांवर उभे राहून घोषणाबाजी केली. या मोर्चात लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, काँग्रेस सरचिटणीस प्रियांका गांधी, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख शरद पवार, समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव , शिवसेना-ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत, द्रमुकचे टी. आर. बालू, तृणमूल काँग्रेसचे डेरेक ओब्रायन, ‘आप’चे संजय सिंह, प्रियंका गांधी-वढेरा, सुप्रिया




सुळे, कणिमोळी आदी खासदार सहभागी झाले होते. शिवसेनेच्या ठाकरे गटाच्या खासदारांनी अस्सल मराठीमध्ये केंद्रीय निवडणूक आयोगाच्या विरोधात घोषणाबाजी केली. काँग्रेसचे शशी थरूर आणि मनीष तिवारीही मोर्चात दिसले. मोर्चादरम्यान तृणमूल काँग्रेसच्या मिताली बाग, महुआ मोईत्रा या दोघी चक्कर आल्याने खाली पडल्या. समाजवादी पक्षाच्या संजना जाटव यांनाही नंतर रुग्णालयात नेण्यात आले.

विरोधकांची ही निदर्शने म्हणजे देशात अराजक व अस्थिरता पसरविण्याचा डाव असल्याची टीका भाजपने केली आहे. राहुल गांधी यांनी मतदारयाद्यांत कथित घोटाळ्याचा आरोप केला होता. त्यानंतर विरोधी पक्षांची ही पहिलीच निदर्शने आहेत. राहुल गांधी यांनी बंगळुरूच्या महादेवपुरा विधानसभा मतदारसंघातील आकडेवारी मांडून ७ ऑगस्ट रोजी आरोप केला होता की ‘मतचोरी’चे हे मॉडेल भाजपला लाभ देण्यासाठी लागू करण्यात आले आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी सोशल मीडियावर नमूद केले की, ‘भाजपची ही भेकड हुकूमशाही चालू देणार नाही. जनतेच्या मताचा अधिकार जपण्यासाठीची, लोकशाही वाचवण्यासाठीची ही लढाई आहे. ‘इंडिया’ आघाडीचे सदस्य संविधानाची ही वाईट अवस्था करू पाहणाऱ्यांचा पर्दाफाश केल्याशिवाय राहणार नाहीत.’ दिल्लीतील एका पोलिस अधिकाऱ्यानुसार, या मोर्चासाठी किंवा निदर्शनासाठी कुणीच परवानगी मागितलेली नव्हती.

## वैद्यकीय कॉलेजच्या विद्यार्थ्याच्या आत्महत्येचा प्रयत्न?




**गोंदिया:-** येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात तृतीय वर्षाला असलेल्या एका एमबीबीएस विद्यार्थ्यानं प्राध्यापकाकडून होणाऱ्या मानसिक त्रासाला कंटाळून गळफास घेत आत्म हत्येचा प्रयत्न केला. शहरातील सिव्हिल लाइन्स परिसरातील भाड्याच्या खोलीत रविवारी मध्यरात्रीनंतर १:३० ते २ वाजेच्या दरम्यान ही घटना घडली. सध्या त्याची प्रकृती चिंताजनक असून त्याच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत
आवेश कुमार (२२, रा. भरतनगर, राजस्थान), असे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या या विद्यार्थ्यांचे नाव आहे. सिव्हिल लाइन्स परिसरात शीतला माता मंदिर चौकात आवेश भाड्याने खोली घेऊन राहत होता. याच खोलीत त्याने गळफास घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. मित्रांच्या व्हॉट्सअॅप ग्रुपवर हाताने लिहिलेली चिठ्ठी पोस्ट करत त्याने आत्महत्येचा प्रयत्न केला.
शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील एका प्राध्यापकाने सदर विद्यार्थ्याच्या आईबद्दल अपशब्द बोलून विद्यार्थ्याचा मानसिक छळ केल्याचे सदर विद्यार्थ्याने लिहिलेल्या सुसाईड पत्रावरुन दिसून येत आहे.सदर विद्यार्थ्यावर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अतिदक्षता कक्षात उपचार करण्यात आले असून प्रकृती धोक्याबाहेर आहे.विशेष म्हणजे ज्या प्राध्यापकाच्या नावाचा उल्लेख पत्रात करण्यात आलेला आहे,त्या प्राध्यापकांनी दोन ते तीन महिन्याआधी गैरहजर राहत असल्याने पालकांशी सवांद करुन देण्यासंदर्भात सुचना केली होती,अशी माहिती महाविद्यालयाच्या सुत्रांनी दिली.
सदर विद्यार्थ्याचा पत्र हाती लागला असला तरी पत्राची सत्यतेबद्दल अधिकृत बोलता येत नसले तरी सदर वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्राध्यापकाला उद्देशून शिक्षकाचे वर्तन चांगले असायला हवे,वाटल्यास विद्यार्थ्याला शिक्षा द्यायला काही हरकत नाही.परंतु विद्यार्थ्यांच्या आईवडीलांबाबत अपशब्दाचा वापर करुन मानसिक छळ करण्याचा अधिकार नसल्याचे म्हटले असून आपल्याकडे असलेल्या एका व्हीडीओतील संभाषण हे आपण बोलले त्यापेक्षा १० टक्के सुध्दा नाही असे म्हटले आहे.
मिळालेल्या माहितीनुसार सदर विद्यार्थी हा राजस्थान राज्यातील असून तो एमबीबीएसच्या तृतीय वर्षाला असून सतत वर्गात गैरहजर राहत असल्याने कॉलेजच्या प्राध्यापकांनी अनेकदा त्यास समज दिली होती.परिक्षेपुर्वी सुध्दा सदर मुलाला वर्गात जी हजेरी असायला हवी ती नसल्याने आईवडीलांशी संपर्क करुन महाविद्यालयातील प्राध्यापकांशी बोलायला सांगण्यात आले होते,मात्र त्याने त्याकडे दुर्लक्ष केल्याचे बोलले जात आहे.
यासंदर्भात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.कुसुमागर घोरपडे यांच्याशी माहिती घेतले असता सदर प्रकरण खरे असून विद्यार्थ्याची प्रकृती धोक्याबाहेर असून त्या विद्यार्थ्याने केलेल्या कृत्याची चौकशी सुरु करण्यात आली असून चौकशी अहवालानुसार पुढील कारवाई करण्यात येईल.सदर विद्यार्थी वर्गात अनेकदा गैरहजर राहत असल्याने त्यास काही बोलले असेल त्याचा त्याने मनावर घेतल्याचे प्राथमिक दृष्ट्या समोर येत असल्याचे त्यांनी सांगितले.
चौकशी समितीत यांचा समावेश
या प्रकरणानंतर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाने चार सदस्यीय समिती नेमली आहे. या समितीत डॉ. अपूर्व पावडे, डॉ. व्ही. पी. रूखमोडे, डॉ. स्नेहा व वॉर्डन मनू शर्मा आदींचा समावेश आहे.

## सिंधी समाजाच्या कायमस्वरुपी पट्टयांचा मार्ग मोकळा-गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर

गोंदिय :- सिंधी समाज बांधवांच्या दीर्घकालीन मागण्यांपैकी पट्टे वाटपाची समस्या शासनाने मार्गी लावली असून याबाबतचा शासन निर्णय निर्गमीत करण्यात आलेला आहे. लवकरच पात्र नागरिकांना पट्टे वाटप केले जाणार आहे, असे प्रतिपादन गृह (ग्रामीण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार व खनिकर्म विभागाचे राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केले.



गृहनिर्माण राज्यमंत्री गोंदिया जिल्ह्याचे दौऱ्यावर आले असतांना त्यांनी आज (ता.११) येथील शंकर चौक, सिंधी कॉलनी, गोंदिया येथे सिंधी समाजातील प्रतिनिधींसोबत भेट घेतली, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आमदार विनोद अग्रवाल, आमदार डॉ.परिणय फुके, सीता रहांगडाले, माजी आमदार हेमंत पटले व विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ.भोयर पुढे म्हणाले, महिलांवरील वाढत्या अत्याचारांना आळा घालण्यासाठी गोंदिया जिल्ह्यामध्ये निर्भया पथक व दामिनी पथक अधिक सक्रीय करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. सिंधी समाजाला न्याय मिळवून देण्यास त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी शासन स्तरावर निरंतर प्रयत्न सुरु असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

आमदार विनोद अग्रवाल म्हणाले, सिंधी समाजाच्या काही समस्या आहेत, त्या समस्या सोडविण्यासाठी आपण सदैव प्रयत्नशील आहोत. शासन निर्णयानुसार लवकरच सिंधी समाजाला मालकी हक्काबाबत पट्टे देण्यात येणार आहेत असे त्यांनी सांगितले.

आमदार डॉ.परिणय फुके म्हणाले, गोंदिया जिल्ह्यातील सिंधी समाजातील समस्या सोडविण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहे. यासाठी शासन स्तरावर एक बैठक लावण्यात यावी असे त्यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजु नोतानी यांनी केले. सुत्रसंचालन किशोर तलरेजा यांनी केले, तर उपस्थितांचे आभार गुड्डू चांदवानी यांनी मानले. कार्यक्रमास सिंधी पंचायत पदाधिकारी, विविध क्षेत्रातील प्रतिनिधी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राज्यातील रास्त भाव दुकानदारांच्या मार्जिनमध्ये वाढ

### क्विंटल मागे १७० रुपये मिळणार

**मुंबई:**राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकारकांना अन्नधान्य व साखरेचे वाटप करणाऱ्या रास्त भाव दुकानदारांच्या मार्जिनमध्ये क्विंटल मागे २० रुपयांची वाढ करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. त्यामुळे आता दुकानदारांना क्विंटलमागे वीस रुपयांची वाढ मिळाल्याने यापूर्वीच्या १५० रुपयांऐवजी १७० रुपये मार्जिन मिळणार आहे.

अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब योजना शिधापत्रिकाधारकांना ५३ हजार ९१० रास्तभाव दुकानदारांमार्फत ई-पॉस मशिनद्वारे बायोमेट्रीक पडताळणी करून अन्नधान्य, साखर व इतर वस्तुंचे वितरण करण्यात येते.

या दुकानदारांना केंद्र शासनाकडून ४५ रुपये आणि राज्य शासनाकडून १०५ रुपये असे एकूण क्विंटलमागे १५० रुपये मार्जिन म्हणून दिले जात होते. या मार्जिन रकमेत वाढ करण्याची विनंती या दुकानदारांच्या संघटनांकडून करण्यात येत होती. त्यानुसार या मार्जिनमध्ये क्विंटलमागे २० रुपयांची वाढ करण्यास मंजुरी देण्यात आली. त्यानुसार क्विंटलमागे रास्त भाव दुकानदारांना १७० रुपये (१७०० रुपये प्रति मेट्रीक टन) असे मार्जिन देण्यात येणार आहे. या निर्णयामुळे दरवर्षी सुमारे ९२ कोटी ७१ लाख रुपयांची अतिरिक्त तरतूद केली जाणार आहे.

## राज्यात १५ हजार पोलीस भरतीला मान्यता ;मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय

**मुंबई:**-राज्यातील हजारो तरुणांची गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू असलेली प्रतिक्षा आज संपली आहे. आज मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या महत्त्वाच्या बैठकीत तब्बल १५ हजार पोलीस पदांच्या भरतीसंदर्भात निर्णय झाला आहे. आजच्या कॅबिनेट बैठकीत १५ हजार पोलीस भरतीच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे अनेक महिने थांबलेल्या भरती प्रक्रियेला वेग येणार असून, पोलिस दलाला ताज्या दमाचे मनुष्यबळ मिळणार आहे.




राज्यातील पोलीस भरतीची प्रक्रिया काही महिन्यांपूर्वी सुरू होण्याची अपेक्षा होती, मात्र प्रशासकीय कारणांमुळे ती लांबणीवर गेली. यामुळे उमेदवारांमध्ये नाराजीचे वातावरण होते. मंत्रिमंडळाच्या बैठकीत पोलीस भरतीला मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे आता लवकरच भरती जाहिरात प्रसिद्ध केली जाईल आणि ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू होईल, अशी माहिती आहे. या भरतीद्वारे राज्यातील तरुणांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील. ग्रामीण भागातील तसेच शहरातील हजारो उमेदवार पोलीस दलात सामील होण्यासाठी सज्ज आहेत. महायुती सरकारने राज्यातील सुरक्षा यंत्रणा मजबूत करण्यासाठी आणि बेरोजगारी कमी करण्यासाठी ही मोठी भरती करण्याचा निर्णय घेतला आहे.

पोलिस दलात ताज्या आणि ऊर्जावान तरुणांचा समावेश झाल्याने कायदा-सुव्यवस्था अधिक प्रभावी होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. भरती प्रक्रियेत शारीरिक चाचणी, लेखी परीक्षा आणि मुलाखत अशा टप्प्यांचा समावेश असणार आहे. तसेच पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित पद्धतीने ही प्रक्रिया राबवण्याचा सरकारचा मानस आहे. महायुती सरकार आल्यानंतर पोलीस भरतीच्या तारखेची आतुरतेने वाट पाहणाऱ्या उमेदवारांसाठी आजचा दिवस निर्णायक ठरला आहे.

## विकसित भारताचा अमृत काळ सेवा, सुशासन, गरीब कल्याणाची ११ वर्ष विषयावरील मल्टिमीडिया छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन आज

**गोंदिया,:** माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकारच्या केंद्रीय संचार ब्यूरो, क्षेत्रीय कार्यालय, नागपूर आणि जिल्हा प्रशासन, गोंदिया, जिल्हा परिषद गोंदिया, जिल्हा माहिती कार्यालय, गोंदिया यांच्या संयुक्त विद्यमाने १३ ते १५ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ यावेळेत गोंदिया येथील जयस्तंभ चौकातील नविन प्रशासकीय इमारत येथे विकसित भारताचा अमृत काळ सेवा, सुशासन, गरीब कल्याणाची ११ वर्ष आणि स्वातंत्र्याची अमृत गाथा या विषयावर मल्टिमीडिया छायाचित्र प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.
प्रदर्शनाचे उद्घाटन उद्या बुधवारी (दि.१३) सकाळी ११ वाजता होणार आहे. हे प्रदर्शन १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत चालणार असून सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत नागरिकांसाठी खुले राहणार आहे. सर्वांना प्रवेश नि:शुल्क असून नागरिकांनी प्रदर्शनाला भेट द्यावी, असे आवाहन माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकारच्या केंदीय संचार ब्यूरोचे क्षेत्रीय प्रचार अधिकारी हंसराज राऊत यांनी केले आहे.

## प्रलंबित मागण्यांना घेवून काँग्रेसचा बैलबंडी मोर्चा

**सडक अर्जुनी:-** निवडणुकीच्या काळात महायुतीतील नेत्यांना मोठमोठी आश्वासने दिवेलून रस्ता काबिज केली मात्र आता शासनाला दिलेल्या आश्वासनाचा विसर पडला आहे. परिणामी शेतकरी, शेतमजुर व सर्वसामान्य नागरिक आजघडीला अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. बळीराज्याचे समस्या अद्यापही मार्गी लागल्या नाही. त्याच प्रमाणे तालुक्यातील अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. तेव्हा शासनाने दिलेल्या आश्वासनाच पुर्तता करावी, या मागणीला घेवून आज ११ ऑगस्ट रोजी ताकुला काँग्रेस पक्षाच्या वतीने बैलबंडी मोर्चा काढण्यात आला. तसेच मागण्यांचे निवेदन तहसीलादर इंद्रायणी गोमासे यांच्या मार्फत मुख्यमंत्र्यांना पाठविण्यात आले. तालुक्याती प्रलंबित प्रश्नांना सोडविण्यासाठी काँग्रेस पक्षाच्या वतीने आज बैलबंडी मोर्चा काढण्यात आला. दरम्यान तहसील कार्यालया परिसरात पोहचताच मोर्च्याचे सभेत रुपांतर झाले तसेच तहसीलदार यांच्या प्रलंबित मागण्यांच्या संदर्भात चर्चा करून मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.



यामध्ये सुप्रीम कोर्टाने जो नुकताच वन जमिनी बाबत निर्णय दिला आहे त्या निर्णयाची अंमलबजावणी महसूल व वनविभागाने सुरु केली आहे ते तातडीने थांबविण्यात यावे, उन्हाळी धान पीक विक्रीचे विक्रीचे उद्दिष्ट वाढवून सरकारच्या हमीभावाने धान खरेदी करण्यात यावे. राज्य सरकारने गरीब व विविध प्रवर्गातील नागरिकांसाठी रमाई घरकुल योजना, सबरी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत, मोदी आवास योजना बंद केल्या होत्या त्यापूर्वक सुरू ठेवण्यात यावे, रोजगार हमी योजनेच्या कामाची देयके वेळेवर देण्यात यावे, धान उत्पादक शेतकऱ्यांना तातडीने बोनस देण्यात यावे, स्मार्ट मीटर लावणे बंद करण्यात यावे, शेतीपंपाकरता १६ तास विद्युत पुरवठा करण्यात यावा, निस्तारान हक्काप्रमाणे बैलबंडी धारकांना रेती वाहून नेण्याची परवानगी देण्यात यावी, इयत्ता ११ वीच्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया बंद करण्यात यावी अशा आदी मागण्यांचा समावेश करून मागण्याचे निवेदन मुख्यमंत्र्यांना पाठविण्यात आले.

यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दिलीप बंसोड, माजी जिप सदस्य तथा सरपंच गंगाधर परशुरामकर प. स. सदस्य डॉ. रुखीराम वाढई, उपसरपंच निशांत राऊत, पुष्पाताई खोटेले, मीराबाई झोहवणे, किरणलाई हटवार, नीनाताई राऊत, वंदनाताई थोटे, सुधाताई राऊत, वीरू गौर, एफ आर टी शहा, सुधाकर कुर्वे, संतोष लाडे, शिवम चांदेवार, लेखलाल टेकाम, हेमू वालदे, अशोक संयम, नागेश पटणे, रमेश भोयर, कौसल्या सोनुले, शाहिद पटेल, मोरेश्वर राजगिरे, मंगेश गहाणे, यांच्यासह शेकडो नागरिक उपस्थित होते.

### मुख्य शासकीय ध्वजारोहण मंगलप्रभात लोढा यांच्या हस्ते


**गोंदिया :-** १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनानिमित्त येथील मुख्य शासकीय ध्वजारोहण राज्याचे कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.



राज्यामधील जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी पुढील मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात यावे, असे सामान्य प्रशासन विभागाच्या राजशिष्टाचार शाखेने सोमवारी (दि. ११) काढलेल्या परिपत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे. त्यानुसार जिल्हानिहाय ध्वजारोहण करणाऱ्या मंत्र्यांच्या नावाची यादी जाहीर केली. त्यात गोंदिया येथील मुख्य शासकीय ध्वजारोहण हे कौशल्य विकास मंत्री ममंगलप्रभात लोढा यांच्या हस्ते करण्यात येणार असल्याचे म्हटले आहे.

## वायू गुणवत्ता इंडेक्स ७४.८४

**गोंदिया:-** एकीकडे पर्यावरणाचा हास, वृक्षांचे प्रमाण कमी होत चालल्याने त्याचे पर्यावरणावर प्रतिकूल परिणाम होत आहे. त्यामुळे पर्यावरणप्रेमी आणि अभ्यासकांकडून यावर चिंता व्यक्त होत आहे. त्यातच आता जिल्ह्याचा वायू गुणवत्ता इंडेक्स ७४.८४ अंकावर जाऊन पोहोचल्याने चिंतेत पुन्हा भर पडली. उघड्यावर कचरा जाळण्याचे प्रमाण वाढल्याने वायू प्रदूषणात वाढ झाल्याचे सांगितले जात आहे.



जिल्ह्यातील एकूण वनक्षेत्रात १५ चौरस किमीने वाढ झाल्याची दिलासादायक बाब इंडियाज स्टेट फॉरेस्ट रिपोर्ट २०१९ अंतर्गत पुढे आली. निश्चितच ही बाब जिल्हावासीयांसाठी दिलासादायक आहे. जिल्ह्यात एकूण २७२३.०७६ चौरस किमी एवढे वनक्षेत्र आहे. त्यात आता १५ चौरस किमी वनक्षेत्राची भर पडली. उलटपक्षी राज्यातील इतर शहरांच्या तुलनेत गोंदिया शहर व जिल्ह्यात वायू प्रदूषणाचे प्रमाण अल्प आहे. त्यामुळेच येथे शुद्धताही चांगली आहे. मात्र शहरातील प्रदूषणाच्या समस्येत नगर परिषदेकडून येथील हवेची उघड्यावर टाकल्या जाणाऱ्या कचऱ्याची भर पडत आहे. शहरातील केरकचरा मोक्षधाम परिसरातील मोकळ्या जागेवर टाकला जात आहे. कधी-कधी या कचऱ्याला आग लावली जात असल्याने त्यातील दूषित वायूमुळे शहराच्या प्रदूषणात भर पडत असून शहरवासीयांचे आरोग्य धोक्यात आले आहे. शहराची लोकसंख्या १ लाख ७५ हजारांवर असून शहरातील एकूण २० प्रभागांतून दररोज ६० टन कचरा निघतो. शहरातील केरकचऱ्याची नियमित विल्हेवाट लावण्याची जबाबदारी नगर परिषदेवर आहे. यासाठी न.प.मध्ये स्वतंत्र स्वच्छता विभाग आहे. ४० पेक्षा जास्त घंटागाड्यांच्या माध्यमातून केरकचऱ्याचे संकलन केले जाते. परंतु १०० वर्षे पूर्ण झालेल्या गोंदिया नगर परिषदेकडे केरकचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी डम्पिंग यार्ड नाही. त्यामुळे या कचऱ्याची शहराबाहेर उघड्यावरच विल्हेवाट लावली जात आहे. यात बायोवेस्टचाही समावेश असतो. आकडेवारीनुसार जिल्ह्यातील हवामान गुणवत्ता इंडेक्स ७४.८४ आहे. ५० चांगले एक्यूआय या स्तरावर हवेची गुणवत्ता समाधानकारक असल्याचे मानले जाते आणि वायू प्रदूषणास कमी किंवा कोणताही थोका नसतो. मात्र इंडेक्सची आकडेवारी डोकेदुखी वाढविणारी असल्यामुळे आता हवामान सुधारावर जिल्हा प्रशासनाला लक्ष घालावे लागणार आहे.

### नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न

**मंडळाने नगर परिषदेला नोटीस बजावून यावर त्वरित उपाययोजना करण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर काही दिवस सुधारणा झाली. परंतु आता पुन्हा ‘जैसे थे’ परिस्थिती झाली आहे. यादरम्यान वाढलेल्या वायू प्रदूषणामुळे शहरवासीयांच्या आरोग्याचा प्रश्न कायम आहे. गोंदिया जिल्ह्यात फारसे उद्योग नाही, शिवाय वनक्षेत्र अधिक आहे. येथील प्रदूषणाचे प्रमाण इतर शहरांच्या तुलनेत कमी असून हवेची गुणवत्ता ही मध्यम स्वरुपाची आहे.**
**- किशोर पुसदकर, उपप्रादेशिक अधिकारी, प्रदूषण नियंत्रण मंडळ, विभाग भंडारा**

## संपादकीय

# दक्षिणेतील राज्यांचे द्विभाषा भाषा सूत्र

दक्षिणेतल्या कर्नाटक आणि तामिळनाडू या दोन्ही राज्यांनी आपलं म्हणणं खरं करून दाखवलंच. राज्याच्या शैक्षणिक धोरणात त्यांनी त्रिभाषा सूत्र उडवून लावलं असून द्विभाषा सूत्रावरच शिक्कामोर्तब केलं आहे. केंद्र सरकारने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहीर केलं, तेव्हाच त्यातील हिंदीच्या समावेशाला तामिळनाडू सरकारने विरोध केला होता. कर्नाटकातल्या सरकारने असा विरोध केला नव्हता. तिथल्या तेव्हांच्या सरकारने केंद्रातल्या शैक्षणिक धोरणाला पाठिंबाच दर्शवला होता. पण, नंतर आलेल्या काँग्रेस सरकारने मात्र केंद्रातल्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं शैक्षणिक धोरण बाजूला सारून द्विभाषिक धोरणाचाच अंगीकार करायचं नक्की केलं आहे. कर्नाटकात कन्नड आणि तामिळनाडूत तमिळ ही त्यांची पहिली भाषा असेल. इंग्रजीला दुसरं स्थान देण्यात आलं असून राष्ट्राची संपर्क भाषा म्हणून हिंदीला नाकारण्यात आलं आहे. दक्षिणेतल्या राज्यांचा द्रविड संस्कृतीचा आणि आपल्या स्थानिक भाषांबाबतचा आग्रह अनेक वर्षांनंतर अजूनही कायम असल्याचं या दोन्ही राज्यांनी याद्वारे दाखवून दिलं आहे. तिसरी भाषा म्हणून हिंदीला स्वीकारायला महाराष्ट्रातही विरोध झाला. पण, तो मुख्यतः मपहिलीपासून सक्तीफला होता. भाषा शिकण्याला किंवा शिकवण्याला नव्हता. आजही महाराष्ट्रात पाचवीपासून हिंदी ही तिसरी भाषा म्हणून शिकवली जातेच. त्याला कुणाचा विरोध नाही.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात त्रिभाषा सूत्र आहे. पण, पहिलीपासून नाही; पाचवीपासून आहे. त्याची अंमलबजावणी तर महाराष्ट्रात आधीपासूनच सर्वत्र सुरू आहे. भाषिक अल्पसंख्याकांच्या शिक्षण संस्थांमध्ये पहिली भाषा ही त्यांची मातृभाषा, दुसरी भाषा इंग्रजी आणि तिसरी भाषा ते ज्या राज्यात असतील, त्या राज्याची राज्यभाषा (महाराष्ट्रात मराठी) अशा पद्धतीचं त्रिभाषा सूत्र आहे. अगदी तामिळनाडू आणि कर्नाटकातही हेच आहे. उत्तर भारतातल्या वर्चस्वाला विरोध म्हणून त्या राज्यात पूर्वीपासून हिंदीला विरोध असला, तरी त्याची धगही आता केवळ राजकीय पातळीवर आहे. तीही योग्यवेळी राजकारणाच्या सोयीसाठी फुलवली जाते म्हणून. दक्षिणेच्या राज्यात पूर्वी कोणी अन्य भाषिक गेला, तर संपर्काचा अवघड प्रश्न निर्माण होत असे. संपर्क भाषा म्हणून सर्रास वापरल्या जाणाऱ्या हिंदीचा वापर तिथे स्थानिक कटाक्षाने टाळत असत. पण, वाढत्या संपर्क साधनांमुळे आणि माध्यम क्रांतीमुळे ही परिस्थितीही बदलली आहे. कर्नाटकपासून केरळपर्यंत सर्वच राज्यातून लोक रोजगारासाठी बाहेर पडले आहेत. देशात – परदेशात गेलेल्या या स्थलांतरितांना संपर्क भाषेचा आसरा घ्यावा लागतोच. त्याशिवाय संवाद साधणार कसा आणि रोजगार मिळवणार कसा? मुंबईत आलेला दक्षिण भारतीय असो, की आखातात पोहोचलेला – तो हिंदीशी वैर करत नाही, करू शकत नाही. हा संदेश आता त्या राज्यातही पोहोचला आहे. तिथेही सोयीनुसार संपर्क भाषा म्हणून हिंदीचा स्वीकार केव्हांच झाला आहे. दक्षिणेतली राज्यं शिक्षण प्रसारात, शिक्षणाच्या गुणवत्तेत आघाडीवर आहेत. त्याचा फायदा तिथल्या जनतेला मोठ्या प्रमाणावर होतच असतो. इंग्रजीला पसंती आणि प्राधान्य दिल्यामुळे दक्षिणेतल्या विद्यार्थ्यांना आधुनिक विद्याशाखांमध्ये सहज प्रवेश घेता येतो. प्रावीण्यही मिळवता येतं. जे शिक्षणाच्या प्रवाहातून फेकले जातात, त्यांचाच प्रश्न असतो. त्यांची हिंदी या संपर्क भाषेअभावी सुरुवातीला चांगलीच कुचंबणा होते. ही व्यावहारिक अडचण तिथल्या जनतेला कळते, तशी राजकारण्यांनाही कळते. पण, भाषा हा तिथल्या राजकारणात अस्मितेचा महत्त्वाचा मुद्दा असल्याने त्यांचाही नाईलाज होतो!

महाराष्ट्राची विचार करण्याची पद्धत वेगळी आहे. ममहाराष्ट्रफ या शब्दातच मराष्ट्रफ असल्याने महाराष्ट्र नेहमीच राष्ट्राचा व्यापक विचार करतो. स्वातंत्र्य चळवळीचं केंद्र महाराष्ट्रच होतं. त्यामुळे, महाराष्ट्राची मानसिकता नेहमी राष्ट्रीय राहिली आहे. अस्मितांच्या हिंदोळ्यांपेक्षा महाराष्ट्राच्या राजकारणाची ओळख मविचारावर चालणारंफ, मविकासात्मक दृष्टिकोन असलेलंफ, मप्रगतिशीलफ अशी होती. ती आता बदलू लागली आहे, हा भाग वेगळा. पण, तरीही दक्षिणेतल्या राज्यातलं शिक्षणाला असलेलं महत्त्व, त्याकडे पाहण्याची संवेदनशील दृष्टी महाराष्ट्राने पुन्हा अंगीकारण्याची गरज आहे. तामिळनाडूने त्यांच्या २०२५–२६च्या अर्थसंकल्पात शालेय शिक्षणासाठी ४४ हजार ४२ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. राज्याच्या एकूण अर्थसंकल्पाच्या १३.७ टक्के एवढी ही तरतूद आहे. देशात सर्वाधिक! शालेय विद्यार्थ्यांसाठी मध्यान्ह भोजनाची अभिनव कल्पना राबवणाऱ्या या राज्याने आता मुलांना शाळेत न्याहारीही सुरू केली आहे. झोपडपट्टी किंवा अगदी दुर्गम, दुष्काळी भागात काम करणाऱ्या शिक्षकांना या दोन्हींचं महत्त्व पटकन कळेल. विद्यार्थ्यांच्या ग्रहणशक्तीवर याचा किती सकारात्मक परिणाम होत असेल, तेही हे शिक्षक सांगतील. ढोबळ यश सांगायचं, तर मध्यान्ह भोजनाबरोबर न्याहारी सुरू केल्याने मुलांचं शाळेत दाखल होण्याचं तिथलं प्रमाण ९५ टक्क्यांवर गेलं आहे. गळतीचं प्रमाण अवघं तीन टक्के आहे. प्रत्येक शाळेत विज्ञानाची प्रयोगशाळा, डिजिटल वर्गांबरोबरच त्यांनी विद्यार्थ्यांची तार्किक विचारक्षमता वाढवण्यासाठी अभ्यासक्रमात केलेले बदल अत्यंत महत्त्वाचे आहेत. वातावरणीय बदल, सामाजिक न्यायासारख्या विषयांचा अंतर्भाव अभ्यासक्रमात केला आहे. स्वभाषेचा आग्रह कोणीही धरावाच. मुलांचं प्राथमिक शिक्षणही प्रायः त्या भाषेतूनच व्हावं. पण, त्या भाषेतून जे शिक्षण दिलं जाईल, त्याविषयीही समाजधुरिणांनी आग्रही असायला हवं. भाषेबरोबरच तामिळनाडूसारखं आशयाबद्दल आग्रही राहिलं नाही, तर तो गाफिलपणा पुढच्या किती पिढ्यांना भोगायला लागेल कुणास ठाऊक!

# हिंदी सक्तीमागे दडलंय काय?(हिंदी के पिछे क्या है?)

हिंदी सक्तीला बहुसंख्य महाराष्ट्र जनांचा विरोध आहे. विरोध करणाऱ्या अभ्यासकांनी, सामाजिक संघटनांनी, राजकीय पक्षांनी त्यांची अभ्यासपूर्ण भूमिका लोकांसमोर ठेवली. म्हणूनच हिंदी सक्तीच्या विरोधात मराठी जनता ठामपणे निर्धाराने रस्त्यावर उतरली. सहा वर्षांच्या बालकांवर हिंदीची सक्ती करण्यातून मातृभाषा मराठीचा पाया कमकुवत होऊ शकतो, हा त्यातला सर्वाधिक महत्त्वाचा मुद्दा आहे. त्यासोबतच मराठी केवळ भाषा नाही, ती महाराष्ट्राच्या विविध भागातील बोलींची एकजूट आहे. येथील विविध जाती धर्मातील समतावादी संतांच्या साहित्यांनी समृद्ध झालेली मराठी महाराष्ट्रातील जनतेची जनभाषा आहे. अठरापगड जातींना सोबत घेऊन लढणाऱ्या शिवरायांच्या मावळ्यांची ती संस्कृती आहे. हिंदी सक्ती हा मराठी भाषा आणि संस्कृतीचे दमन करुन मराठीला दुय्यम करण्याचा प्रयत्न हिंदी सक्तीमध्ये दिसतो. यामुळे महाराष्ट्रातील सर्व जातीधर्माच्या लोकांनी हिंदी सक्तीला विरोध केला. हिंदी सक्तीला विरोध हा मराठी जनांचा आत्मसन्मानाचा लढा म्हणून पुढे आला. हिंदी भाषेला, हिंदी भाषिकांना, हिंदी साहित्यिकांना मराठी जनतेने विरोध केलेला नाही. किंवा द्वेषही केला नाही. आमच्या मुलांचा शिक्षणाचा पाया कमजोर होऊ नये आणि आमच्या मराठी संस्कृतीवर अतिक्रमण होऊ नये , एवढी रास्त अपेक्षा लोकांची होती. ती लोकांनी हिंदी सक्तीचा पहिला प्रयत्न झाल्याबरोबर व्यक्त केली. परंतु हिंदी सक्ती मागे घेतल्याचे जाहीर केल्यानंतर पुन्हा ती ऐन सत्र सुरू होताना घाईघाईने लागू केली गेली. त्याची तीव्र प्रतिक्रिया महाराष्ट्रात उमटली. शिवसेना मनसे एकत्र येत, महाराष्ट्र एकीकरण समिती, विद्रोही सांस्कृतिक चळवळ, सत्यशोधक समाज,सत्यशोधक विचारांच्या संघटना, भाषा शास्त्राचे अभ्यासक, विचारवंत, स्वतंत्र बाणा असलेले पत्रकार, शिक्षक संघटना इत्यादींनी एकजूट होऊन विरोध केला. हिंदी सक्तीच्या विरोधात मोर्चाचे आयोजन जाहीर केले गेले. मजबुत विरोधामुळे सरकारने माघार घेऊन हिंदी सक्तीचे दोन्ही निर्णय मागे घेतले. परंतु परत डॉ.नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. त्यामुळे मराठी भाषा आणि संस्कृतीवर अतिक्रमण होऊ शकते ही शक्यता कायम राहिली.

हिंदी सक्तीचा निर्णय महाराष्ट्रातील मराठी भाषिक जनतेने जवळजवळ धुडकावून लावला. ते आता सहज स्विकारतील ही शक्यताही कमी झाली. यानिमित्ताने काही गोष्टी घडल्या. त्याचे सामाजिक अंगाने विश्लेषण झाले पाहिजे.

पुन्हा डोके वर काढू नये, या सावधगिरीच्या दृष्टीने, उद्धव आणि राज या ठाकरे बंधूंच्या ऐक्याच्या निमित्ताने विजयी सभा घेण्यात आली. मुस्लिम हिंदी भाषिक म्हणून ओळखले जातात. परंतु ते मराठी लोकांच्या बाजुने उभे झाले. असदुद्दीन ओवेसी आणि इम्तियाज यांनी ठाकरे बंधूंचे कौतुक केले. तामिळनाडूचे मुख्यमंत्री स्टॅलिन यांनी देखील पाठिंबा जाहीर केला. या घटनांवरुन विविध जातीधर्माचे समुह बंधुभाव वाढवण्याच्या बाजुचे आहेत. केंद्राच्या सक्तीच्या विरोधात आहे. हे स्पष्ट झाले. लोकांचा सहभाग पाहून सत्ताधारी चरकले.

किरकिरी झाल्यानंतर देखील हिंदी सक्तीचा मुद्दा पुढे का रेटला जात आहे? याच्यामागे काय दडले आहे? हिंदी के पिछे क्या है? याचे आडाखे आता विविध हालचालींवरुन पुढे येत आहे. खरे तर आमच्यावर हिंदीची सक्ती नको , एवढाच मराठी माणसासाठी हा मुद्दा होता. परंतु त्याला मराठी भाषिक विरूद्ध हिंदी भाषिक असे स्वरूप देऊन भडकवण्याचा प्रयत्न का होत आहे? यात कुठले राजकारण शोधले जात आहे? याचीही चिकित्सा झाली पाहिजे. हिंदी राष्ट्रीय भाषा आहे, हा भ्रम लोकांमध्ये का वारंवार पेरला जातो?

हिंदी भाषा देखील अनेक भाषांना हिंदीचे लेबल लावून बहुसंख्य लोकांची भाषा म्हणून पुढे आणली गेलेली आहे. प्रत्यक्षात भोजपुरी, आदिवासी , मैथिली,हरीयान्वी, राजस्थानी, उर्दू इत्यादी स्वतंत्र भाषांवर अतिक्रमण करून हिंदीचा फुगवटा वाढवला जात असल्याचे समोर येत आहे. त्या त्या भाषांची स्वतंत्र संस्कृती आहे. ते सांस्कृतिक स्वातंत्र्य नष्ट करण्याची मनीषा हिंदी भाषेच्या सक्तीतून पुढे येत आहे.

हिंदी सक्तीच्या माध्यमातून सांस्कृतिक अतिक्रमण करण्याचा प्रयत्न होत आहे का? यादृष्टीने देखील चर्चा सुरू झाली. एखादी भाषा सक्तीने लादून त्या प्रदेशातील भाषेची, भाषिक संस्कृतीची पिछेहाट करणे किवा मागे ढकलणे मान्य होऊ शकत नाही. देशाच्या प्रत्येक भागातील बोलीभाषेतून त्या त्या भागातील संस्कृती, वैशिष्ट्यपूर्ण मानवी जीवन, मूल्यव्यवस्था प्रवाहित होत आलेली आहे. ती टिकावी, सर्व भाषा, संस्कृतींचा आदर सन्मान राखला जावा , ही अपेक्षा बाळगून १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात मातृभाषेच्या शिक्षणाला अधिक महत्त्व दिले. भाषावार प्रांतरचनेतून सुद्धा भाषा संस्कृती जपणुकीवर भर दिला गेला. भारताच्या सामायिक सांस्कृतिक वारशाची जपणूक या गाभाभूत घटकाचा समावेश म्हणूनच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ मध्ये करण्यात आला होता. ही पार्श्वभूमी लक्षात घेऊन एखाद्या भाषेला जबरदस्तीने थोपवण्यातून मूळ उद्देशाला तडा जाऊ शकतो. खरे तर मराठी भाषेचा दोन हजार पेक्षा जास्त वर्षाचा इतिहास असल्याने, मराठी भाषेला दुय्यमत्व येईल असे प्रयत्न मान्य होऊ शकत नाही.तरीही असे प्रयत्न होत असेल तर त्यामागील भूमिका तपासणे गरजेचे आहे. आर्थिकदृष्ट्या देशात सर्वाधिक मजबूत असलेले शहर मुंबई महाराष्ट्रातून तोडणे, हे उद्दिष्ट हिंदीच्या माध्यमातून पूर्णत्वास नेण्याचा इरादा असल्याची शंका मराठी जनांना येणे स्वाभाविक आहे. तसा प्रयत्न अनेकदा झाल्याचा इतिहास आहे. परंतु त्यापेक्षाही मोठे उद्दिष्ट काही घडामोडीवरुन स्पष्ट होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या धोरणानुसार एका भाषेचे प्रभुत्व निर्माण करुन (तीही संस्कृतच्या जवळची हिंदी ,उर्दू प्रभावित हिंदी नाही) कष्टकरी लोकांच्या मानसिकतेवर एक चालकानुवर्ती व्यवस्था थोपवायची मनिषा आहे. मुख्यमंत्र्याचा अट्टाहास आणि सरसंघचालक मोहन भागवत यांचा नुकताच व्यक्त झालेला संस्कृत आग्रह, हिंदी सक्ती मागे काय दडलय? याचा उलगडा होण्यास मदत होईल. मराठी भाषा आणि संस्कृती विकासासाठी खर्च करतांना मागेपुढे पाहणारे, व्यवहारात निरुपयोगी संस्कृतवर अवास्तव खर्च करण्याचा प्रयत्न लोकहिताचा असू शकत नाही. संस्कृत ही सर्व भाषांची जननी असल्याचे मोहन भागवत वारंवार लोकांना सांगत फिरतात. यातील खरेपणा समजून घेणे आवश्यक आहे.

३ ऑक्टोबर २०२४ केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय घेतला गेला. अभिजात भाषेचा दर्जा मिळावा म्हणून महाराष्ट्र शासनाने पाठपुरावा करण्यासाठी एक समिती नेमली होती. या समितीने त्यांच्या अहवालात नोंदवलेल्या बाबी लक्षात घेणे आवश्यक आहे. २००४ साली तामिळ भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. असा दर्जा मिळवणारी तामिळ ही पहिली अभिजात भाषा आहे. त्यानंतर संस्कृत, तेलुगू, कन्नड, मल्याळम आणि ओडिया या भाषांना अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. आणि आता मराठी, पाली, प्राकृत, आसामी आणि बंगाली या भाषांचा समावेश अभिजात भाषांमध्ये करण्यात आला. हिंदी राष्ट्रभाषाही नाही आणि अभिजात भाषाही नाही. तरीही हिंदी सक्ती केली जात असेल तर त्यामागील हेतु समजला पाहिजे.

मराठी ही अभिजात भाषा आहे, याचा पाठपुरावा करताना महाराष्ट्र शासनाने दिलेल्या अहवालात आणखी महत्त्वाची माहिती आहे. २०१२ साली तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी ज्येष्ठ साहित्यिक प्रा.रंगनाथ पठारे यांचे अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. प्रा.हरी नरके त्या समितीचे समन्वयक होते. मराठी भाषा संस्कृत मधून निर्माण झाली, हे मत हा अहवाल खोडून काढत आहे. तसे पुरावे अहवालात नमूद आहेत. एक हजारावर ग्रंथ, शिलालेख, ताम्रपट आदींचे संदर्भ दिलेले आहेत. त्यातील ठळक बाबी,

१. मूळ विदर्भातील वाशीमचे असलेल्या गुणाढ्य नावाच्या व्यक्तीने पंजाबात जाऊन मबृहत्कथाफ हा ग्रंथ मपैशाचीफ या प्राकृत भाषेत लिहिला. दोन हजार वर्षांपूर्वी लिहिलेल्या या ग्रंथात अनेक प्रकरणे मराठी भाषेतील आहेत.तसेच श्रीलंकेत दोन हजार वर्षांपूर्वी मदिपवंशफ आणि ममहावंशफहे दोन ग्रंथ लिहिले गेले. त्यात अनेक मराठी भाषिकांचा उल्लेख आहे. तर मविनयपिटकफ या अडीच हजार वर्षांपूर्वी उत्तर भारतात लिहिलेल्या बौद्ध ग्रंथात ममहाराष्ट्रफ हा प्रदेशवाचक उल्लेख आहे.

या अहवालात असेही म्हटले आहे की, वैदिकपूर्व भाषांमधून संस्कृतचा जन्म झाला तसाच मराठीचाही झाला. जुन्नरच्या नाणेघाटात प्राचीन शिलालेख आढळला आहे. तो ब्राम्ही लिपीत आणि महाराष्ट्री प्राकृत मध्ये आहे. २२२० वर्षांपूर्वीच्या या शिलालेखात मराठी बोलणाऱ्यांचा उल्लेख ममराहठींनोफ असा करण्यात आला आहे. संस्कृतपासून प्राकृतभाषा आली आणि त्यातून पुढे मराठी जन्माला आली, या गैरसमजाला यात पुराव्यासहित छेद देण्यात आला. प्राकृत मराठी, महारठी,मरहट्टी, देशी महाराष्ट्री आणि मराठी असे मराठी भाषेचे वेगवेगळे नामोल्लेख करण्यात आले असले तरी ती एकच भाषा होती, हे या अहवालात स्पष्ट केले आहे.

मराठीच्या ५२ बोलीभाषा आहेत.जगातील १० व्या क्रमांकाची भाषा आहे.७२ देशात मराठी बोलली जाते.भारताच्या सर्व प्रांतात मराठी भाषक आहेत. ही संपूर्ण माहिती प्रसाद कुलकर्णी यांनी आपल्या लेखात लिहिलेली आहे. अभिजात मराठी भाषा समितीचे समन्वयक प्रा. हरी नरके यांनी मराठी संस्कृत पेक्षाही जुनी असल्याचा उल्लेख अभिजात मराठी या त्यांच्या लेखात पुराव्यानिशी केला. त्यासंबंधी अनेक उल्लेखापैकी म. म. राजारामशास्त्री, विदुषी दुर्गा भागवत यांचे आजोबा , यांनी १८८५ सालीच महाराष्ट्री प्राकृत किंवा महारठ्ठी या नावाने प्रचलित, लोकप्रिय व मान्यताप्राप्त असलेली भाषा ही संस्कृतपेक्षाही जुनी असल्याचे दाखवून दिले होते. त्यांचा मराठ्यांसंबधी चार उद्गार आणि मराठीची विचिकित्सा या ग्रंथाचाही उल्लेख प्रा. हरी नरके यांनी आपल्या लेखात केला आहे. म. म.राजारामशास्त्री यांच्या संशोधनाचा निष्कर्ष सांगताना दुर्गा भागवत म्हणाल्या जुनी महाराष्ट्री संस्कृतपेक्षा जुनी व खरी जीवंत भाषा आहे, हे त्यांनी दाखवले आहे. यावरून महाराष्ट्री भाषा ही किमान अडीच हजार वर्षे जुनी, म्हणजे इसवी सनाच्या आधीच्या पाचव्या शतकाइतकी जुनी असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. म्हणजे ती कन्नड आणि तेलुगू यांच्यापेक्षा जास्त जुनी किंवा तितकीच जुनी असली पाहिजे. म्हणूनच मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. इतकी समृद्ध असलेली मराठी भाषा आणि संस्कृतीवर अतिक्रमण होणार असेल तर ते कदापिही खपवून घेतले जाऊ शकत नाही. एक भाषा , एक पार्टी, एक संस्कृती असे म्हणत लोकांवर एकतेची भूरळ पाडायची , समतेच्या प्रवाहांना दुय्यम ठरवायचे आणि विविधतेचा सन्मान करुन, देशातील सर्व सामाजिक प्रवाहांचा सन्मान करुन एकता निर्माण करणाऱ्या लोकशाही संरचनेला ठेच पोचवायचे प्रयत्न देशहिताचे नाही. आणि एक भाषा, एक संस्कृती कोणी ठरवायची? कशाच्या आधारावर ठरवायची?

भारताचे फेडरल स्टेट रचनेला तडा देण्याचे प्रयत्न यात होताहेत का? याबाबत देखील विचार झाला पाहिजे. शिक्षण हा राज्याचा विषय असताना केंद्राचे जसेच्या तसे ऐकणे म्हणजे राज्याचे सर्वाधिकार केंद्राकडे गहाण ठेवण्यासारखे आहे. केंद्रशासित प्रदेश आणि घटक राज्य यातील फरक विसरायला लावणाऱ्या ह्या घटना आहेत का? हेही समजून घेणे आवश्यक आहे. भाषेच्या माध्यमातून प्रदेशातील जनतेच्या अहिताची संस्कृती थोपवली जाण्याचे प्रयत्न वारंवार झाले. त्यामुळेच तामिळनाडू आणि दक्षिणेतील राज्यांनी हिंदी सक्तीला वेळोवेळी विरोध केला. हा विरोध प्रादेशिक भाषा आणि संस्कृती यांचे जतन करण्यासाठी आहे. इतर भारतीय भाषांचा आणि भाषिकांचा द्वेष करण्यासाठी मुळीच नाही. राजकीय लाभ घेण्यासाठी मराठी आणि हिंदी भाषिकांमध्ये तेढ निर्माण करणारांना महाराष्ट्रातील जनतेचा पाठिंबा नसून तीव्र विरोध आहे. संत कबीर,मुंशी प्रेमचंद यांसारख्या हिंदी साहित्यिकांवर मराठी जनतेने अलोट प्रेम केलेले आहे. हिंदी प्रांतात वास्तव्य करणाऱ्या मराठी लोकांसाठी हिंदी सक्ती केली तर समजता येईल. परंतु मराठी भाषिक महाराष्ट्रातील लोकांसाठी हिंदी सक्ती हा उरफाटा प्रकार आहे. अर्थात हिंदी भाषेला किंवा हिंदी जनतेला आम्ही शत्रू मानत नाही. परंतु हिंदीच्या आडून संस्कृत आणि संस्कृतच्या आडून मनुस्मृतीची, वेदाची – भेदाभेदाची, विषमतेची संस्कृती लादण्याचा प्रयत्न होत असेल तर समतावादी विद्रोही संत परंपरा लाभलेला महाराष्ट्र, अठरापगड जातींतील मावळ्यांना सोबत घेऊन लढणाऱ्या छत्रपती शिवरायांना मानणारा महाराष्ट्र, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या समतावादी विचाराने समृद्ध झालेला महाराष्ट्र असे प्रयत्न हाणून पाडण्यासाठी निश्चितपणे प्रयत्न करणार आहे. हिंदीच नाही कोणत्याही भाषेची सक्ती महाराष्ट्र खपवून घेणार नाही, ही भूमिका घेऊन मराठी भाषा आणि संस्कृती बचाव साठी विद्रोही सांस्कृतिक चळवळ रणमैदानात ही घोषणा देत हिंदी सक्ती पूर्णपणे मागे घेतपर्यत आंदोलन जारी ठेवण्याची घोषणा केली. भाषा, धर्म, जात, वर्ण या आधारावर भेदाभेद करुन बिनखर्चाचे राजकारण मुंबई आणि बिहार निवडणूकीत लाभ मिळवण्यासाठी असल्याचे स्पष्ट होत आहे. दुबे सारखा वाचाळवीर मराठी, महाराष्ट्र द्वेषाची भाषा, गुंडगिरीची भाषा बिहार लाभासाठी करत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. बेरोजगार, शेतकरी, कामगार, महिला , शिक्षण यांच्या प्रश्नांवर, लोककल्याणकारी योजनांवर काम करुन राजकारण करण्यासाठी समतावादी दृष्टीने काम करावे लागते. लोकहिताचा कणव नसणाऱ्यांच्या हे पचनी पडत नाही. म्हणूनच अशा दुष्ट मनसुब्यांना हाणून पाडण्यासाठी, मराठी भाषा आणि संस्कृतीच्या रक्षणासाठी लढणाऱ्या सर्व संघटनांनी, पक्षांनी, विचारवंतांनी एकजुटीने लढण्याची काळजी घेतली पाहिजे.

**बाबा बीडकर, नागपूर**

# एमआरटीआयची अंमलबजावणी केव्हा?

गोंदिया–तत्कालीन सरकारने ७ ऑगस्ट २०२४ रोजी अल्पसंख्याक समुदायाच्या सक्षमीकरणासाठी एमआरटीरआय स्थापनेची घोषणा केली. परंतु एक वर्षाचा कालावधीत लोटूनही जिल्ह्यात योजनेची अंमलबजावणी झाली नाही.त्यामुळे योजनेच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. यासंदर्भात एनएसयूआयच्या शिष्टमंडळाने राज्यसभा खासदार तथा काँग्रेस अल्पसंख्याक विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष इम्रान प्रतापगढी जी यांना निवेदन सादर केले आहे. निवेदनातून त्यांनी योजनेच्या अंमलबजावणीत दिरंगाईचे व अन्य बाबी सार्वजनिक करण्याची मागणी केली आहे.

राज्याच्या तत्कालीन सरकारने अल्पसंख्याक समुदायातील मुस्लिम, शीख, ख्रिश्चन, बौद्ध, जैन व पारशी समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक सक्षमीकरणासाठी अल्पसंख्याक संशोधन आणि प्रशिक्षण संस्था (एमआरटीआय) स्थापन करण्याची घोषणा केली होती. तसेच ११ पदांसाठी प्रशासकीय मान्यता देवून अर्थसंकल्पात ६.२५ कोटींची तरतूद करण्यात आली. सोबतच धोरणात्मक निर्णय, संशोधन व प्रशिक्षणासाठी एक विशेष संस्था स्थापन करण्याचे आश्वासन देण्यात आले. परंतु घोषणा होऊन एक वर्षाचा काळ लोटला असतानाही योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. संस्थेच्या स्थापनेसाठी कायमस्वरूपी वा तात्पुरती कार्यालयाची तरतूद करण्यात आली नसून कोणत्याही प्रकारची नियुक्ती किंवा भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली नाही. मंजूर निधी वापरण्यात आला नसून संशोधन किंवा प्रशिक्षण यासारखे कोणतेही सरकारी काम सुरू करण्यात आले नाही. त्यामुळे शासनाचही घोषणा केवळ घोषणाला ठरल्याचे दिसत असल्याने अल्पसंख्याक समुदायामध्ये सरकारबद्दल अविश्वासाची भावना निर्माण होत आहे.

एनएसयूआयचे जिल्हाध्यक्ष अमन तिगाला यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने नागपूरमध्ये राज्यसभा खासदार तथा काँग्रेस अल्पसंख्याक विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष इम्रान प्रतापगढी यांची भेट घेऊन योजनेसंदर्भातील विविध मागणीचे निवेदन सादर केले. या निवेदनात, एमआरटीआय स्थापनेला होणाऱ्या विलंबाची कारणे सार्वजनिक करावीत, संस्था स्थापन करण्यासाठी स्पष्ट वेळापत्रक जाहीर करावे,मंजूर अर्थसंकल्पाची माहिती जाहीर करावी, योजनेसाठी जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांची माहिती सार्वजनिक करावी आदींचा समावेश आहे. दरम्यान, शिष्टमंडळाने खा. इम्रान प्रतापगढी यांना अल्पसंख्याक समुदायाचे भविष्य आणि हक्कांचे रक्षण करण्यासाठी संसद आणि संघटना पातळीवर हा मुद्दा गांभीर्याने उपस्थित करण्याची मागणी केली. शिष्टमंडळात गोंदिया जिल्हाध्यक्ष अमन तिगाला व तिरोडा विधानसभा सचिव मोहम्मद कुरेशी, तिरोडा तालुकाध्यक्ष अनुराग पंधेरे, तालुका उपाध्यक्ष नीलेश सतीसेवाक, जिल्हा सचिव गौरव बिसेन उपस्थित होते.

# कलंकीत मंत्र्यांची हकालपट्टी करा–शिवसेना




गोंदिया–महायुती सरकारने कलंकीत मंत्र्यांची हकालपट्टी करावी, अशी मागणी करीत शिवसेनेने (उद्धव बाळासाहेब ठाकरे) ११ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जनआक्रोश आंदोलन केले.जिल्हाप्रमुख पंकज यादव व शैलेश जायस्वाल यांनी आंदोलनाचे नेतृत्व केले.

सरकारमधील कोणी मंत्री अधिवेशन सुरू असताना सभागृहात रमीचा डाव खेळतात, तर दुसरा मंत्री बिछानाच्या शेजारी नोटांनी भरलेल्या बॅगा घेऊन बसतात. कोणी महनी ट्रॅपफमध्ये अडकतो. बेताल वक्तव्य करतात. जनभावनेचा अनादर करण्याचे काम अनेक मंत्र्यांनी केले असतानाही केवळ महायुतीचा धर्म पाळण्यासाठी मंत्र्यांचे राजीनामे घेतले गेले नाही, याचा निषेध यावेळी शिवसेनेने (उद्धव बाळासाहेब ठाकरे) केला. सरकारमधील कलंकित मंत्र्यांची आम्हाला लाज वाटते, अशी घोषणाबाजी करीत शिवसेनेने जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली. महाराष्ट्राला कलंक लावणाऱ्या या कलंकीत मंत्र्यांची हकालपट्टी करण्याची यावेळी मागणी केली. माझ्या राज्याचा मंत्री नोटांची बॅग घेऊन बसतो मला लाज वाटते, माझ्या राज्याचा मंत्री हनी ट्रॅपमध्ये अडकतो मला लाज वाटते, माझ्या राज्याचा मंत्री डॉन्सबार चालवतो मला लाज वाटते, माझ्या राज्याचा मंत्री विधीमंडळात रमी खेळतो मला लाज वाटते, माझ्या राज्याचा मंत्री अघोरी जादूटोणा करतो मला लाज वाटते अशा जोरदार घोषणा यावेळी शिवसैनिकांनी करत सरकारच्या निष्क्रियेतेचा निषेध केला. आंदोलनात शिवसेना, युवासेना, महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांसह शिवसैनिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. दरम्यान, जनआक्रोश आंदोलनानंतर आंदोलक शिवसैनिकांनी मागण्यांचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी भय्यासाहेब बेहरे यांना दिले.

**जागतिक आदिवासी दिन साजरा**

**गोंदिया :** शहरात ९ ऑगस्टला जागतिक आदिवासी दिन समाजबांधवांनी उत्साह आणि संस्कृतीचा सुंदर संगम साधत पारंपरिक वादन आणि पारंपरिक पोशाखांमध्ये सजलेल्या समाजबांधवांनी रॅली काढून साजरा केला. शहराच्या विविध मार्गाने रॅली निघून डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, मरारटोली येथे कार्यक्रमाचा समारोप कार्यक्रम संपन्न झाला. समारोपीय कार्यक्रमात जननायक बिरसा मुंडा यांच्या तैलचित्राला माजी आमदार राजेंद्र जैन व उपस्थित मान्यवरांच्या यांच्या हस्ते माल्यार्पण करण्यात आले.

# झुंबा क्लासेसमध्ये अवयवदान जनजागृती




**गोंदिया :–** अंगदान जीवन संजीवनी अभियानांतर्गत केटीएस रुग्णालयाच्या वतीने बुधवारी (दि. ६) शहरातील माय वे झुंबा मध्ये अंगदान जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात केटीएस रुग्णालयातील नेत्रदान सल्लागार भाविका बघेले यांनी, अंगदानाचे महत्त्व, कोणते अवयव दान करता येतात, नेमकी कोणती प्रक्रिया असते, कायदेशीर बाबी, मेदूमृत व्यक्तीचे महत्त्व या सर्व गोष्टींवर सखोल मार्गदर्शन केले.

अनेकांनी यावेळी ऑनलाइन अंगदानासाठी संमती फॉर्म भरून नोंदणी केली. कार्यक्रमात योगा सेंटरचे सदस्य तसेच नागरिकांनी उत्साहाने सहभाग घेत अवयवदानाची प्रतिज्ञा घेतली. कार्यक्रमासाठी उन्नती बुरडे यांनी सहकार्य केले.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# रक्षाबंधन हा धागा नाही, तो नात्यांचा एक मजबूत दोरा आहे–आमदार डॉ.परिणय फुके



**गोंदिया:–** रक्षाबंधनाच्या निमित्ताने, भाजप महिला मोर्चा आघाडी गोंदियाच्या वतीने आज ११ ऑगस्ट रोजी गोंदिया शहरातील पवार सांस्कृतिक समाज भवनात आयोजित केलेल्या ङ्गलाडले भैया परिणय फुकेङ्ग या कार्यक्रमाला सैकड़ो लाडली बहिणींनी उपस्थिती लावली आणि भाऊ परिणय फुके यांच्या हाथावर नात्याचा मजबूत धागा बांधून त्यांचे प्रेम आणि विश्वास दाखवला.पोवार सांस्कृतिक समाज भवनाच्या विशाल हॉल, कक्ष आणि अंगणात फक्त महिलाच होत्या. आपल्या लाडक्या बहिणींचे हे प्रेम पाहून, डॉ. परिणय फुके यांनी भावाचे कर्तव्य बजावत, बहिणींना भेटवस्तू देऊन प्रत्येक पावलावर त्यांच्यासोबत उभे राहण्याचा विश्वास व्यक्त केला.

आमदार डॉ. परिणय फुके म्हणाले की, गोंदियातील बहिणींचे अतूट प्रेम मला कधीही दूर जाऊ देत नाही हे माझे भाग्य आहे. रक्षाबंधन हा एक धागा नसून नात्यांचा एक मजबूत दोरा आहे जो मला खेचतो. बहिणींची राजकीय, सामाजिक आणि आर्थिक प्रगती व्हावी यासाठी मी नेहमीच प्रयत्न केले आहेत. बहिणींच्या आर्थिक प्रगतीसाठी, लाडके मुख्यमंत्री देवभाऊंनी लाडली बहन योजना सुरू केली आणि त्यांचा सन्मान केला.

रक्षाबंधन कार्यक्रमादरम्यान, बहिणी सकाळपासूनच रांगेत उभ्या होत्या, डॉ. परिणय फुके यांच्यासोबत प्रेमाचे बंधन बांधण्यासाठी उत्सुक होत्या. प्रत्येक बहिणीसाठी, भावाने दोन्ही हात पुढे करून प्रेमाचे बंधन बांधले.जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून भाजप महिला आघाडी मोर्चाच्या बहिणी उपस्थित होत्या. डॉ. परिणय फुके यांनी सर्व बहिणींचे आशीर्वाद घेतले, मातांचे चरणस्पर्श केले आणि लहान बहिणींवर प्रेम आणि आपुलकीचा वर्षाव केला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भाजप जिल्हाध्यक्षा सीताताई रहांगडाले, सविताताई पुराम, रचनाताई गहाणे, रजनीताई कुंभरे, पूर्णिमाताई ढेंगे, स्नेहाताई मानकर, श्रद्धा अग्रवाल, भावनाताई कदम, प्रतिभाताई परिहार, योगिताताई पुंड, चित्रकला चौधरी, सुनंदा उइके, सुनीता हेमने(तरोने), मथुला बिसेन, पूजा तिवारी, शैलजा सोनवाने, दीपिका चन्द्रिकापुरे, तुमेश्वरी बघेले, सुनीता लिल्हारे, शिला चौहान, लक्ष्मी(बबली) चौधरी, माधुरी रहांगडाले, दीपमाला बिसेन, अनिता मेश्राम, पूजा जैसवाल, लक्ष्मी कनोजिया, रंजीता कनोजिया, देवकी भण्डारकर, रितु मंडल, पद्मा उके, स्वाति चौधरी, रूपेश्वरी राणे यांच्यासह सर्व तहसीलमधील महिला मोर्चाच्या अधिकारी व कार्यकर्ते सैकडोंच्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन शुभा भारद्वाज यांनी केले.

# मंडल–नाचिअप्पन आयोगासाठी संघर्ष करा:डॉ.गुरुदास येडेवार

**आमगाव :–** मंडल आयोगाने हक्क अधिकार बहाल करून शेतकरी कामगार जातींचे ओबीसी अस्तित्व निर्माण केले आहे. परंतु अजूनही मंडल आयोगाच्या संपूर्ण शिफारशी लागू झालेल्या नाहीत. त्यानंतर २००५ पासून नाचिअप्पन कमिटीच्या शिफारसी संसदेत धूळ खात पडून आहेत. त्यासाठी सर्वांनी संघर्ष करून आपला सामाजिक, शैक्षणिक , आर्थिक विकास व या देशातील सत्ता संपत्ती मधील भागीदारीचा मार्ग प्रशस्त करावे, असे आवाहन ओबीसी सेवा संघ गोंदिया जिल्ह्याचे कार्याध्यक्ष डॉ. गुरुदास येडेवार यांनी मंडल यात्रेच्या सभेत केले.



ओबीसींची जनगणना त्वरित सुरू करण्यात यावी, महाजोती संस्थेला १००० कोटी रुपयांच्या बजेट अवंटीत करावे या प्रमुख दोन मागण्यांसाठी विदर्भात २ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट दरम्यान मंडल यात्रेचे आयोजन ओबीसी युवा अधिकार मंचच्या नेतृत्वात इतर ओबीसी संघटनांच्या सहकार्याने करण्यात आले होते. ही मंडल यात्रा नागपूर, यवतमाळ, चंद्रपूर , गडचिरोली जिल्ह्यातून मार्गक्रम करीत ६ जूनला सायंकाळी ५ वाजता गोंदिया जिल्ह्यातील आमगाव येथे पोहोचली असून भव्य स्वागत, बाईक रॅली ने नगर भ्रमण करीत यात्रेचे रूपांतर सभेत झाले. यासभेचे अध्यक्षस्थान ओबीसी सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष प्रा. बी.एम . करमकर यांनी भूषविले. मंडल यात्रेचे संयोजक उमेश कोराम, डॉ. गुरुदास येडेवार ,निखिल बनसोड, सविताताई बेदरकर, चंद्रकुमार बाहेकर यांनी सभेला मार्गदर्शन केले.या प्रसंगी जिल्हा परिषद सदस्या छबुताई उके, ओबीसी अधिकार मंचचे खेमेंद्र कटरे, शंकर पाल, सुभाष उके, ओबीसी सेवा संघाचे गोंदिया तालुकाध्यक्ष रामभागात पाचे, ओबीसी सेवा संघाचे आमगाव तालुकाध्यक्ष हरीश ब्राह्मणकर, ओबीसी संघर्ष समितीचे तालुकाध्यक्ष लिलाधर गिरेपुंजे यांची प्रमुख उपस्थिती होती. मंडल यात्रेचे संयोजक उमेश कोराम यांनी ओबीसी जातनिहाय जनगणना जोपर्यंत होत नाही, अर्थसंकल्पात संख्याप्रमाण वाटा मिळत नाही तोपर्यंत ओबीसी, एसबीसी, व्हीजे एनटी समाजाच्या विकासाचा मार्ग मोकळा होणार नाही, म्हणून सर्वांनी मंडल ओबीसी आंदोलनात सहभागी व्हावे असे आवाहन करीत वसतिगृह, महाज्योती संस्थेच्या योजनांची माहिती दिली. जाती विसरून ओबीसी म्हणून संघटीत व्हा असे म्हणत निखिल बनसोड यांनी मार्गदर्शन केले. प्रा.बी. एम. करमकर यांनी तुम्ही अन्य कितीही यात्रा करा आपल्या मुलाबाळांचा विकास या मंडल यात्रेनेच होणार आहे, सांगत स्त्रियांनी व्रतवैकल्ये कर्मकांड यातून बाहेर पडावे व आपल्या मुलांच्या शिक्षणावर लक्ष द्यावे असे अध्यक्षीय भाषणात म्हणाले. मंडल यात्रेची व समाजातील बुद्धिवादी लोकांची भूमिका सावन कटरे यांनी मांडली. सुरेंद्र मेंढे यांनी संचालन व रोहित हत्तीमारे यांनी उपस्थितांचे आभार मानले. यशस्वीतेसाठी देवचंद बिसेन, दिपक मेंढे, विनायक येडेवार, मुरलीधर करंडे, महेंद्र चव्हाण, विकास पटले, कुणाल शिवणकर ,भुमेश शेंडे, बालू वंजारी, हरीश राऊत यांनी अथक परिश्रम घेतले.

# ओबीसीच्या सर्वांगीण विकासाकरीता मंडल आयोग महत्वाचा–इंजि.राजकुमार बडोले




**सडक अर्जुनी:**–ओबीसी समाजाच्या विकासासाठी जातनिहाय जनगणना ही अत्यावश्यक असल्याचे तसेच ओबीसी विद्यार्थ्यांनी वसतिगृहाचा लाभ घ्यावा या मुख्य उद्देशाला घेऊन २ ऑगस्टपासून ओबीसी युवा अधिकार मंचचे संयोजक उमेश कोराम व ओबीसी अधिकार मंचचे खेमेंद्र कटरे यांच्या नेतृत्वात निघालेल्या यात्रेचे दुर्गा चौक येथे(दि.०६) स्वागत करण्यात आले.अर्जुनी मोरगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार इंजि.राजकुमार बडोले यांनी मंडल आयोगाने शेतकरी कामगार जातींचे ओबीसी अस्तित्व निर्माण केले आहे.परंतु अजूनही मंडल आयोगाच्या संपूर्ण शिफारशी लागू झालेल्या नाहीत,त्या लागू व्हावे व ओबीसींना हक्क अधिकार मिळावे याकरीता मंडल आयोग ओबीसी समाजाने समजून घेणे आवश्यक असल्याचे विचार व्यक्त केले. तसेच आपण सामाजिक न्याय मंत्री असतानाच ओबीसी समाजाकरीता बार्टीच्या धर्तीवर संस्था असावी असा प्रयत्न केल्याचेही त्यांनी सांगितले.

देशात ७ ऑगस्ट १९९० ला मंडल लागू झाल्याची घोषणा करण्यात आली. मंडल आयोगाने ओबीसी समाजाला आरक्षण दिल्याने हा दिवस ओबीसी अधिकार दिन म्हणून साजरा व्हावा या यात्रेचा उद्देश असल्याचेही आमदार बडोले म्हणाले. ही यात्रा बुधवारी (दि. ६) सकाळी ११ वाजता सडक अर्जुनी येथील दुर्गा चौकात पोहोचली. यावेळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून समाजबांधवांच्यावतीने मंडल यात्रेचे मुख्य संयोजक उमेश कोराम,खेमेंद्र कटरे आणि त्यांच्या सहकार्याचे स्वागत करण्यात आले. ओबीसींची जातनिहाय जनगणना व्हावी, ओबीसीचा बॅकलाग भरून काढावा, प्रत्येक तालुक्यात वसतिगृह व्हावे, क्रिमीलेयर अट रद्द व्हावी, यांसारख्या मागण्या घेऊन ही मंडल यात्रा(दि. २) नागपूर येथून निघाली. वर्धा, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, नवेगावबांधमार्गे सडक अर्जुनीवरून गोंदियाकडे रवाना झाली.यावेळी सहकारी शंकर पाल, सुभाष उके,संविधान मैत्री संघाचे अतुल सतदेवे,सी.पी.बिसेन,वसंत गवळी,इंजि आमदार राजकुमार बडोले,ओबीसी संघटनेचे दिनेश हुकरे,नगरसेवक देवचंद तरोणे,जिल्हा बँकेचे संचालक गंगाधर परशुरामकर, नगरपंचायत उपाध्यक्ष वंदना डोंगरवार, सरपंच माधव तरोणे, सभापती चेतन वळगाये, गायत्री इरले, पुष्पा खोटेले, कुणबी समाजाचे अध्यक्ष अनिल मुनीश्वर, रोशन बडोले, जितेंद्र शहारे, मधुसूदन दोनोडे, अनिल मेश्राम, टीकाराम भेंडारकर,अरविंद मेंढे आदी अनेक पदाधिकाऱ्यांसह ओबीसी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विविध कार्यक्रमांनी राजेंद्र जैन यांचा वाढदिवस साजरा



**गोंदिया :–** राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार तथा गोंदिया जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष राजेंद्र जैन यांचा वाढदिवस शुक्रवारी (दि.८) वृक्षारोपण, रक्तदान, गरजूंना साहित्य वाटप तसेच गौमाता पूजन आदी विविध कार्यक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. स्थानिक नमाद महाविद्यालयाच्या सभागृहात त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी सकाळपासूनच त्यांच्या शुभचिंतकांची रांग लागली होती.

माजी आ. राजेंद्र जैन यांना वाढदिवसानिमित्त खा. प्रफुल्ल पटेल, उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, मंत्री छगन भुजबळ, पालकमंत्री बाळासाहेब पाटील, आ. परिणय फुके, गोंदिया शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा वर्षा पटेल यांनी फोन करून शुभेच्छा दिल्या. आ. राजकुमार बडोले,विजय रहांगडाले, राजूभाऊ कारेमोरे, विनोद अग्रवाल, माजी मंत्री नाना पंचबुद्धे, भंडारा जिल्हा बँक अध्यक्ष सुनील फुंडे, प्रेमकुमार रहांगडले, विलास काटेखाये, एकनाथ फेंडर,गोंदिया जि.प. उपाध्यक्ष सुरेश हर्षे,गोंदिया जिल्हा बँक संचालक गंगाधर परशुरामकर,पंकज रहागंडाले, जेष्ट पत्रकार विरेंद्र जायस्वाल,बेरार टाईम्स संपादक खेमेंद्र कटरे, अखिलेश सेठ,जि.प.समाजकल्याण विभाग माजी सभापती पुजा अखिलेश सेठ,बँक संचालक केतन तुरकर,रवि पटले,किशोर तरोणे,जि.प.सदस्य बालु बावनथडे,इंजि.आशिष बारेवार,राजेश भक्तवर्ती,राजू एन.जैन,शंकर रामाणी,पत्रकार अंकुश गुंडावार,देवेंद्र रहागंडाले,महेंद्र बिसेन,शाहिद पठाण,राजकुमार ठाकूर,विनोद हरिणखेडे,पुर्व नगराध्यक्ष अशोक इंगळे,हरिष मोटघरे,लखन बहेलिया,राज शुक्ला सहित गोंदिया भंडारा जिल्ह्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, अन्य यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध समाजसेवी संघटना, शिक्षक, पत्रकार आणि व्यापारी बंधूंनी शुभेच्छा दिल्या

# ग्रामपंचायत अधिकारी युनियन गोरेगाव तालुका अध्यक्षपदी हरिणखेडे तर सचिव अरविंद साखरे



**गोरेगाव:–** महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियन डी एन ई१३६, शाखेची गोरेगाव तालुका कार्यकारीणी गठित करण्यात आली.यात अध्यक्षपदी पी.एस.हरीणखेडे तर तालुका सचिवपदी अरविंद अकिसन साखरे यांची निवड घोटी ग्रामपंचायत कार्यालयात झालेल्या(दि.६) बैठकीत करण्यात आली.

ही सभा संघटनेचे जिल्हा सहसचिव योगेश रुद्रकार यांच्या अध्यक्षतेखाली सभा घेण्यात आली.सभेत खालील प्रमाणे कार्यकारणी गठीत करण्यात आली.यात तालुका उपाध्यक्ष पदावर राजकुमार पटले,रोषणा भैसारे,कोषाध्यक्ष जी.सी.ठाकूर, सहसचिव विनोद कटरे,रीना शहारे, तालुका संघटक चंद्रकला कटरे, सल्लागार सदस्यामध्ये पी.बी.टेंभरे, एस.सी.रहांगडाले,संजू शहारे,सी.ए.रहांगडाले,डीसीपीएस संघटक शिवहरी कायंदे यांची निवड करण्यात आली.सभेचे संचालन अरविंद साखरे यांनी केले तर आभार जी.सी.ठाकूर यांनी मानले.

# अल्पसंख्याक समाजाच्या विकासाकरीता राष्ट्रवादी काँग्रेस कटिबध्द-आमदार नायकवाडी




**गोंदिया:–** अल्पसंख्याक समाजासमोरील सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक प्रश्नांसोबतच समाजाच्या सर्वांगीण सशक्तीकरणासाठी व पक्षाशी त्यांचा विश्वास अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने आगामी काळातील धोरणात्मक पावले उचलण्याचे काम राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी करीत आहे असे प्रतिपादन अल्पसंख्याक सेलचे प्रदेशाध्यक्ष व आमदार इद्रीस नायकवडी यांनी केले.राष्ट्रवादी काँग्रेस भवन, रेलटोली कार्यालय येथे राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्याक सेलची बैठक पार पडली,त्या बैठकिला मार्गदर्शन करताना (दि.१०)ते बोलत होते. या बैठकीला राष्ट्रवादीचे नेते माजी आमदार राजेंद्र जैन प्रामुख्याने उपस्थित होते.

यावेळी माजी आमदार राजेंद्र जैन म्हणाले की, राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि खासदार प्रफुलभाई पटेल यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष केवळ घोषणाबाजी न करता अल्पसंख्याक समाजाच्या प्रगतीसाठी ठोस कृती करत असून पक्ष नेहमीच समाजहितासाठी बांधील असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

यावेळी सालेकसा शहर अध्यक्ष म्हणून अहमदखान गुलाबखान पठाण व नासीर अली अमीर अली सय्यद यांची सालेकसा तालुका अध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मध्ये खासदार प्रफुलभाई पटेल यांच्या नेतृत्वाखाली विश्वास ठेवून इंजमामभाई तेले, रफिकभाई पठाण यांनी प्रवेश केला.

इद्रीस नायकवाड़ी, माजी आमदार राजेंद्रजी जैन, प्रेम राहंगडाले, देवेंद्रनाथ चौबे, अशोक सहारे, केतन तुरकर, नानू मुदलियार, सी के बिसेन, अविनाश काशिवार, जगदीश बावनथड़े, केवल बघेले, खालिद पठान, राजु एन जैन, रवि पटले, नागों बंसोड, हीरालाल साठवने, हित मोठ्या संख्येने पक्ष पदाधिकारी व कार्यकर्ता उपस्थित होते.

# पंचायत समिती सोडून गवई जि.प.च्या लेखाविभागात कसे ?

**गोंदिया:** गोंदिया जिल्हा परिषदेतील बदल्या आणि प्रतिनियुक्त्या हा नेहमीच वादातीत विषय राहिला आहे.काही कर्मचारी तर ज्या विभागात गेले त्या विभागालाच आपला घर समजून बाहेर पडायला तयार नसल्याचे चित्र असतानाच गोंदिया जिल्हा परिषदेच्या लेखा व वित्त विभागात सडक अर्जुनी पंचायत समितीच्या लेखा विभागातील आकाश गवईचे काय काम असा प्रश्न उपस्थित झालेला आहे.माहितीनुसार गेल्या तीन ते चार महिन्यापासून पंचायत समिती सडक अर्जुनी येथील लेखा विभागाचे काम बाजूला सारत सदर आकाश गवई नामक कर्मचारी जिल्हा परिषदेच्या वित्त व लेखा विभागात काम करीत असल्याचे उघडकीस आले आहे.यासंदर्भात त्या विभागात कानोसा घेतला असता सदर गवई या कर्मचार्यास पंचायत समिती कार्यालय सोडून जिल्हा परिषदेच्या वित्त विभागात काम करण्याकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी यांची परवानगीच घेतली गेली नसल्याचे ऐकावयास मिळाले.यावरुन जिल्हा परिषदेत कुणीही कुणालाही कधीही बोलावून काम करीत असल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अधिकारावरच गदा येऊ लागली आहे.

# मग्रारोहयो,रस्ते,शिक्षण व पाणी पुरवठ्यावर गाजली आमसभा




**अर्जुनी मोरगाव:**–तालुक्यातील ग्रामीण भागातील विविध समस्या, रखडलेले प्रकल्प, शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी, तसेच नागरिकांना अधिकाधिक लाभ मिळवून देण्यासोबतच रस्त्यांची अडचण,घरकुल योजनेंतर्गत लाभार्थी समस्या,पाणीटंचाई,शाळांची दुरवस्था,मनरेगांतर्गत पांदन रस्ते,वर्गखोलीची गरज,पाणीपुरवठा योजना आदी विषयावर गाजली प्रसन्ना सभागृहात आयोजित करण्यात आलेली वार्षिक आमसभा.ही आमसभा व सरपंच सम्मेलन आमदार इंजि.राजकुमार बडोले यांच्या अध्यक्षतेखाली(दि.८)पार पडली.

आमसभेत तालुक्यातील ग्रामीण भागातील विविध समस्या, रखडलेले प्रकल्प, शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी, तसेच नागरिकांना अधिकाधिक लाभ मिळवून देण्यासाठी महत्त्वपूर्ण चर्चा व निर्णय घेण्यात आले.या आमसभेत मग्रारोहयोमधे काम करणारी यंत्रणा ग्रामपंचायत असली तरी बहुतांश गावात लाखो रुपये निधीचे टाके निकृष्ठ व बेजबाबदारपणे नाडेफ टाके नाहक बनविण्याचा मुद्दा इसापुरचे उपसरपंच सोनवाने,किशोर तरोणे,विलास बोरकर व अन्य सरपंचानी उपस्थित करुन सभा गाजविली.अर्जुनी–मोर. शिक्षण विभाग सध्या जिल्ह्यासह राज्यात गाजत आहे.प्रसार माध्यमावर गाजत असलेल्या या प्रकरणाची सखोल चौकशीची मागणी आमसभेत करण्यात आली.पाणी पुरवठ्या संदर्भात वडेगांव रेल्वे येथील सरपंच लोणारे यांचे नेतृत्वात आमसभेवर असंख्य महिलांनी घागर मोर्चा आणला होता.तालुक्यात जलजिवन मिशनची कामे मोठ्या प्रमाणात सुरु असली तरी निधी अभावी सदर कामे बंदअवस्थेत असल्याची माहीती देण्यात आली.तरीही तालुक्यात कुठेही पाणी टंचाई भासणार नाही,अशी व्यवस्था तत्काळ करुन देण्याच्या सुचना सभा अध्यक्षांनी दिल्या.

या बैठकीस जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर, पंचायत समिती सभापती आम्रपालीताई डोंगरवार, उपसभापती संदिप कापगते, जि.प. सदस्य यशवंत गणवीर, रचनाताई गहाणे, जयश्रीताई देशमुख, श्रीकांत घाटबांधे, गटविकास अधिकारी पल्लवी धनविजय, सहगटविकास अधिकारी राणे तसेच पंचायत समिती सदस्य सर्वश्री होमराज पुस्तोडे, नुतनलाल सोनवाणे, डॉ. नाजुक कुंभरे, घनशाम धामट, फुलचंद बागडेरीया, प्रमोद लांडगे, सविताताई कोडापे, पुष्पलताताई दृगकर, चंद्रकलाताई ठवरे, कुंदाताई लोगडे, शालिनीताई डोंगरवार, भाग्यश्रीताई आत्राम, सर्व शासकीय विभागप्रमुख, सरपंच व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रायपुर ग्रामपंचायतीच्यावतीने दिव्यांगांना लंच बॉक्स वितरित

**गोंदिया:**– पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या ग्राम पंचायत रायपुर येथे दिव्यांग नागरिकांची सभा बोलवून विविध योजनांची माहिती देण्यात आली.तसेच याप्रसंगी पाच टक्के दिव्यांग निधि अंतर्गत ३७ दिव्यांगांना लंच बॉक्सचे वितरण सरपंच छायाबाई नेवारे व ग्रामपंचायत अधिकारी कमलेश बिसेन यांच्या हस्ते वितरीत करण्यात आले.




गावातील महिला पुरुष दिव्यांगांची विशेष सभा घेवून त्यांचे जीवनमान अधिक सुलभ सहज व आरोग्यवर्धक रहावे.गावात कुपोषण मुक्तीच्या दिशेने वाटचाल व्हावी याकरीता अधिकाधिक जाणिव जागृती व सार्थक उपाययोजना करण्याकरिता त्यांना मार्गदर्शन करण्यात आले.सदर विशेष सभेतील कार्यक्रम वेळी गावातील सर्व दिव्यांगांना लंच बॉक्सचे वितरण करण्यात आले. या सभेला ललिता लोकचंद बिजेवार ,गायत्री घनश्याम रहंगडाले अंगणवाडी सेविका,आशा सेविका विद्या चिंतामण बिजेवार ,अशोक पाचे ग्राम पंचायत कर्मचारी , ज्योतिष रहंगडाले संगणक परिचालक यांनी मदत केली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सरपंच छायाबाई नेवारे होत्या.यावेळी उपसरपंच ओमकांर मात्रे,ग्राम पंचायत अधिकारी कमलेश बिसेन, ग्रामपंचायत सदस्य शैलेश गजभिये सदस्य,उमेश ठाकरे,लता हटेले,सरस्वती टेकाम,उषा फाये,कल्पना कोहरे,अल्का ठाकरे, सामाजिक कार्यकर्ता ओमशंकर रहांगडाले,राजू रहांगडाले,माजी सरपंच केवलचंद रहांगडाले,जीतलाल रहांगडाले , मनोज कोल्हे,केवलराम रहांगडाले,डॉ.सोहनलाल रहांगडाले माजी पंचायत समिती सभापती, नरेंद्र बोरकर सामाजिक कार्यकर्ता,धर्मेंद्र देशभ्रतार सामाजिक कार्यकर्ता, मनोज मेश्राम, संजय घरटे, हरिचंद बिसेन, चुन्नीलाल रहांगडाले, शालिग्राम पाचे, गुनि राम कोहरे, रूपदास दणदरे सामाजिक कार्यकर्ते , दिनेश येशने तमुस अध्यक्ष, लोकचांद बीजेवार पोलीस पाटील उपस्थित होते.

# सेवानिवृत्त पोलिसांना आरोग्य सुविधा मिळवून दया,गृहराज्यमंत्र्याकडे मागणी

## सेवानिवृत्त पोलीस अधिकारी/अमलंदार संघटनेचे निवेदन

**चित्रा कापसे/तिरोडा–** राज्याचे गृह (ग्रामीण ), शालेय शिक्षण, सहकार व खणीकर्म राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर हे (दि.११)गोंदिया जिल्ह्याच्या दौऱ्यावर असतांना सेवानिवृत्त पोलीस अधिकारी/अंमलदार गोंदिया जिल्हा संघटनेच्या वतीने त्यांची भेट घेत सेवानिवृत्त पोलिसांना आरोग्य सुविधेचा लाभ मिळवून देण्याच्या मागणीचे निवेदन सादर करण्यात आले.सेवानिवृत्त पोलीस अधिकारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष योगेश पारधी यांच्या नेतृत्वात निवेदन देण्यात आलेले.या निवेदनात कार्यरत पोलीसांकरिता महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना सेवानिवृत्त पोलिसांना देण्यात यावी.माजी सैनिका प्रमाणे सेवानिवृत्त पोलीसांना सुविधा देण्यात यावी.सेवानिवृत्त पोलीस जिल्हा बोर्डाची स्थापना करण्यात यावी.महसूल कर्मचारी प्रमाणे पोलिसांना वेतन श्रेणी देण्यात यावी.नक्षलग्रस्त भागात काम करणाऱ्या सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक यांना रायफल भत्ता देण्यात यावे.१०-२०-३०आश्वाशीत प्रगती योजनेचा लाभ दिनांक २५/०२/२२ पूर्वीच्या पोलीस अंमलदारांना देण्यात यावे आदी मागण्यांचा समावेश होता.शिष्टमंडळात सेवा.पोलीस संघटनेचे जिल्हाध्यक्ष योगेश पारधी,उमाकांत सरोदे,भैय्यालाल ठाकरे,छोटेलाल मिश्रा,राजेंद्रप्रसाद दुबे,चंद्रकांत दीक्षित,दिलीप यादव,बळीराम ठाकरे,राजू खामले,अनंता नेवारे,दामोधर खांडवाहे उपस्थित होते.



# रुग्णालयामध्ये पेशंटचे मोठे बिल; शुल्काचा तक्ता लावलाय काय?

**गोंदिया :–** आजघडीला हॉस्पिटलमध्येउपचार घेणे म्हणजे केवळ आजाराशी लढणे नाही, तर बिलाशी देखील लढावे लागते. डॉक्टरांचे उपचार कमी आणि बिलाचे टेन्शन अधिक, असे चित्र अनेकवेळा दिसून येते. त्यामुळे रुग्णालयाबाहेर दर्शनी भागात कोणत्या उपचारासाठी किती खर्च, रूम भाडे, आयसीयू भाडे याचा चार्ट आहे का, हे पहिले पाहा. कारण, हा चार्ट रुग्णालयाच्या दर्शनी भागात लावणे खासगी रुग्णालयांना सक्तीचे करण्यात आले आहे. रुग्णालयातून डिस्चार्ज घेताना हातात येणारे अंतिम बिल पाहून नातेवाइकांच्या पायाखालची जमीन हादरते.

एवढे बिल कसे म्हणून रुग्णालय प्रशासनाशी हुज्जत घातली जाते. यासाठी जर अगोदरच रुग्णालयातील शुल्क आकारणीची पाटी पाहिली असेल, तर असे वादावादीचे प्रसंग घडणार नाहीत. मोघम बिल सांगून रुग्णाला कधीही रुग्णालयात ॲडमिट करू नका. रुग्णाला डिस्चार्ज घेताना अंतिम बिल हातात आल्यानंतर नातेवाईक तपासत नाहीत. कोणत्या ठिकाणी जीएसटी लावली आहे. हे पाहणे गरजेचे असते. हे न पाहिल्यामुळे नातेवाइकांची फसवणूकही होऊ शकते.



## हे बंधनकारक

**महाराष्ट्र नर्सिंग होम रजिस्ट्रेशन कायद्यानुसार प्रत्येक खासगी व सरकारी हॉस्पिटलने रुग्ण हक्क सनद दरपत्रक व रुग्णांसाठी तक्रार निवारण कक्षाची माहिती दर्शनी भागात प्रदर्शित करणे कायद्याने बंधनकारक आहे.**

## नर्सिंग होम ॲक्टनुसार कारवाईची काय तरतूद ?

**नर्सिंग होम ॲक्टनुसार, नर्सिंग होमच्या नोंदणी, तपासणी आणि नियमांचे पालन न झाल्यास कारवाईची तरतूद आहे. यामध्ये नोंदणी नाकारणे किंवा रद्द करणे, तसेच दंड आकारणे इत्यादी कारवाईचा समावेश आहे**

## कायद्यानुसार अपेक्षित सुविधा कोणत्या?

**नर्सिंग होम ॲक्टनुसार, नसिंग होममध्ये काही आवश्यक सुविधा आणि मानके असणे अपेक्षित आहे. यामध्ये वैद्यकीय सुविधा, नर्सिंग सपोर्ट, स्वच्छ आणि सुरक्षित वातावरण, तसेच रुग्णांच्या गरजा पूर्ण करणारी इतर आवश्यक व्यवस्था यांचा समावेश होतो.**

**जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापनासाठी असलेल्या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. शहरात असा कोठे जैव कचरा दिसत नाही. योग्य व्यवस्थापन सुरू आहे.**
**– डॉ. पुरुषोत्तम पटले, जिल्हा शल्यचिकित्सक, गोंदिया.**

# न.प.मध्ये ओबीसींचे संख्याबळ राहणार कायम!

**गोंदिया :–** ओबीसी आरक्षण आणि प्रभाग रचनेमुळे गोंदिया, तिरोडा नगर परिषदेची निवडणूक गेल्या तीन वर्षांपासून रखडली आहे. परिणामी नगर परिषदेत प्रशासकराज कायम आहे. मात्र, सर्वोच्च न्यायालयाच्या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे आता नगर परिषद निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला आहे. गोंदिया आणि तिरोडा नगर परिषदेत ओबीसींचे आधीचेच संख्याबळ कायम असणार असून, त्यानुसारच आता निवडणुका होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.




सन २०१७ मध्ये झालेल्या गोंदिया नगर परिषदेत नगरसेवकांची संख्या एकूण ४२ होती. त्यामध्ये २७ टक्के ओबीसी आरक्षण कायम राहणार असून, त्यात ११ जागा ओबीसींसाठी राखीव राहणार आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे ओबीसींना मोठा दिलासा मिळाला आहे. गोंदिया नगर परिषदेचा कार्यकाळ ९ फेब्रुवारी २०१७मध्ये पूर्ण झाला. मात्र, ओबीसी आरक्षण आणि प्रभाग रचनेमुळे निवडणुका लांबणीवर गेल्याने तीन वर्षांपासून प्रशासकराज कायम आहे. गोंदिया नगर परिषदेत एकूण २१ प्रभाग असून ४२ जागा आहेत. त्यात ११ जागा या ओबीसींसाठी राखीव आहेत. नगर परिषदेने प्रभाग रचनेचा प्रारूप आरखडा तयार केला असून, त्यात शहरात १ प्रभाग वाढणार असल्याची माहिती आहे. पण,प्रभाग रचनेला अंतिम स्वरूप आल्यानंतरच ते स्पष्ट होईल. त्यामुळे गोंदिया नगर परिषदेत ओबीसींचे आधीचेच संख्याबळ कायम राहणार असल्याची माहिती न.प.च्या अधिकाऱ्यांनी दिली.

# संविधान ओबीसींच्या उत्थानाचे प्रमुख साधन-प्रदीप ढोबळे



**भंडारा :-** ओबीसी सेवा संघ व इतर ओबीसी संघटनांच्या वतीने मंडल दिनानिमित्त आयोजीत विदर्भस्तरीय जनगणना यात्रेचा समारोपीय कार्यक्रम ७ऑगस्ट रोजी भंडारा शहरातील संताजी मंगल कार्यालयात पार पडला. यानिमित्ताने भंडारा शहरातून ओबीसी जनजागृतीसाठी बाईक रॅली काढण्यात आली. या रॅलीत हजारो ओबीसी बांधव सहभागी झाले होते. यावेळी विविध घोषणांनी भंडारा शहर दुमदुमले होते.

अध्यक्षीय भाषणात ओबीसी सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष अॅड. प्रदीप ढोबळे यांनी संविधान हेच ओबीसींच्या उत्थानाचे मुख्य साधन असल्याचे म्हटले. विदर्भातील सात जिल्ह्यांतील अनेक गावांमध्ये जनजागृती करत मंडल यात्रेचा भंडारा येथे समारोप झाला. यावेळी ओबीसी युवा अधिकार मंचाचे संयोजक उमेश कोर्राम म्हणाले, जोपर्यंत सरकार ओबीसींची जातनिहाय जनगणना करून आकडेवारीनुसार निधी व सर्वस्तरीय आरक्षण देत नाही, तोपर्यंत हा लढा सुरूच राहणार असल्याचे ठासून सांगितले.याप्रसंगी ओबीसी सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष अॅड. प्रदीप ढोबळे, डॉ. संजय शेंडे,

## ओबीसींच्या मंडल जनगणना यात्रेचा भंडाऱ्यात समारोप

मंडल यात्रेचे संयोजक उमेश कोर्राम, ओबीसी अधिकार मंचेच खेमेंद्र कटरे, सावन कटरे,गोपाल सेलोकर, सदानंद ईलमे, योगेश शेंडे, भैय्याजी लांबट, प्रभाकर वैरागडे, मंगला वाडीभस्मे, कृतल आकरे, ललिता देशमुख, अनिता बोरकर, हिरा झंझाड, सुभाष उके, सुरेश खंगार उपस्थित होते.

संचालन महिला सेवा संघाच्या सरचिटणीस शुभदा झंझाड आणि संपर्क प्रमुख गोपाल देशमुख यांनी केले. आभार जिल्हा सरचिटणीस संजीव बोरकर यांनी मानले.

प्रभाकर वैरागडे, राजू धुर्वे, दिनेश आकरे, संजय आजबले, संजीव बावनकर, दिलिप बावनकर, रमेश शहारे, रोशन उरकुडे, अरुण जगनाडे, श्रीकृष्ण पडोळे, प्रा. विष्णू जगनाडे, ईश्वर निकुळे, भाऊराव वंजारी, सुभाष पाल, प्रकाश मुटकुरे, मनोहर टिचकुले, रविशंकर साकोरे, पुरुषोत्तम समरित, सेवक हजारे, तुळशीराम बोंदरे, किशोर डोकरीमारे, पंजाब कारेमोरे, मंगला वाडिभस्मे, अनिता बोरकर, ललिता देशमुख, लता बोरकर, वृंदा गायधने, भावना निकुळे, शारदा शहारे, शामली उरकुडे, ज्योती झलके, सुचिता लुटे, माधुरी निंबार्ते, आशा जगनाडे व सर्व ओबीसी बांधव.



# वृक्ष लागवड व संगोपन ही काळाची गरज म उप मुकाअ कुतीरकर



**सडक अर्जुनी:-** आधुनिकीकरणामुळे दिवसेंदिवस पर्यावरणाचा ऱ्हास होत असल्याने नागरिकांच्या आरोग्यावार विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे वृक्ष लागवड करून त्याचे संगोपन करणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) फरेंद्र कुतीरकर यांनी केले.

दिनांक ९ ऑगस्ट २०२५ रोजी सडक अर्जुनी तालुक्यातील ग्राम पंचायात दोडके/जा येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जांभळी च्या आवारात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत व लोक सहभागातून जागतिक आदिवासी दिनानिमित्त ङ्गएक पेड माँ के नाम ङ्घ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते उपस्थितांना मार्गदर्शन करताना बोलत होते.

सदर कार्यक्रमात जिल्हा परिषद सदस्य भूमेश्वर पटले, पंचायत समिती सभापती चेतन वळगाये, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) विजय लोंढे, गटविकास अधिकारी दिलीप खोटेले,पंचायत समिती सदस्य शालिंद्र कापगते, सरपंचा सौ. रंजिताताई कोराम, उपसरपंच विजय सोनवाने, ग्रामपंचायत अधिकारी बी. डी.लांजेवार आदी उपस्थित होते.

यावेळी उपस्थित अतिथींनी जागतिक आदिवासी दिन व वृक्ष संवर्धन या विषयावर आपले विचार व्यक्त केले. आपला जिल्हा हा जरी जंगलाने व्याप्त असला तरी दिवसेंदिवस वृक्ष तोडीमुळे त्याचा परिणाम होऊ लागला आहे. त्यामुळे पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून वृक्ष लागवड व संगोपन महत्वाचे असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.कार्यक्रमाला शाळेतील शिक्षक, ग्रामपंचायतिचे इतर पदाधिकारी व गावातील नागरिक व इतर विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

## जिल्हा कोषागार कार्यालयातर्फे पेंशन अदालतीचे आयोजन

गोंदिया: जिल्हा कोषागार कार्यालयाच्या वतीने दिनांक १४ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात (DPDC H$all) कार्यशाळा तथा पेंशन अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यशाळेत आहरण व संवितरण अधिकारी (DDOs) यांच्यासाठी ए-G$PF$ प्रणाली तसेच ए-Revision Pension Cases (सुधारित प्राधिकारपत्र) या विषयांवर मार्गदर्शन करण्यात येईल. याचबरोबर पेंशन अदालतीत निवृत्तीवेतनधारकांसाठी ङ्गपेंशनर समाधानफ उपक्रमांतर्गत त्यांच्या विविध समस्या व तक्रारींचे निराकरण कोषागार अधिकारी करतील.जिल्हा कोषागार अधिकारी समिर देशमुख यांनी निवृत्तीवेतनधारकांना आवश्यक कागदपत्रांसह कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# कार्यकर्ते हेच खरी ताकद, विकासासाठी सदैव सोबत राहीन-आमदार राजकुमार बडोले

**अर्जुनी-मोरगाव:-** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अर्जुनी-मोर तालुकाच्या वतीने कार्यकर्ता आढावा बैठक काल दिनांक ९ ऑगस्ट रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती सभागृह येथे आमदार तथा माजी मंत्री इंजि. राजकुमार बडोले यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली.



या बैठकीत आमदार बडोले यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, ङ्गकार्यकर्ते हेच खरी ताकद असून, विकासकामे आणि संघटन बळकट करण्यासाठी मी सदैव आपल्या सोबत राहणार आहेङ्घ. तसेच, संघटन बळकट करताना विकासाच्या गतीत वाढ होईल याची ग्वाही दिली.जिल्हाध्यक्ष प्रेम राहंडाले यांनी संघटनात्मक मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, माननीय प्रफुल पटेल साहेब यांच्या नेतृत्वाखाली विकासकामांना चालना मिळेल आणि एवढे मोठे नेतृत्व लाभल्याने विकासाच्या संधी अधिक वाढतील.

कार्यक्रमाला तालुका अध्यक्ष लोकपाल गहाणे, महिला जिल्हाध्यक्ष राजलक्ष्मीताई तुरकर, माजी जि.प. उपाध्यक्ष यशवंत गणवीर, ओबीसी जिल्हाध्यक्ष किशोर तरोणे, पंचायत समिती सभापती आम्रपाली डोंगरवार, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती यशवंत परशुरामकर, दि लक्ष्मी राईस मिल अध्यक्ष भोजराम रहेले, नगराध्यक्ष मंजुषा बारसागडे, महिला तालुकाध्यक्ष सुशीलाताई हलमारे, युवक तालुकाध्यक्ष किशोर ब्राह्मणकर, माजी जि.प. सदस्य रतिराम राणे, नगरपंचायत सभापती दाणेश साखरे, योगेशजी नाकाडे, दादाजी संग्रामे, सुखदेवजी मेंढे, आकाश ठवरे, सुधांशु मेहता आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.बैठकीत पक्षातील विविध पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करून नियुक्तीपत्र देण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन उद्धवजी मेंहदळे यांनी केले तर आभार अजय शहारे यांनी मानले.या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महिला आघाडीच्या वतीने रक्षाबंधन कार्यक्रमही पार पडला.

# समर्पित व्हा, पक्षनिष्ठतेचा फळ मिळतो-जि.प.अध्यक्ष भेंडारकर

**अर्जुनी मोरगाव-** भारतीय जनता पार्टी विचारांवर चालणारी पार्टी आहे.पक्षात घराणे शाहीला थारा नाही. संघटनेत कार्यकर्त्याला महत्त्वाचे स्थान आहे.हे कार्यकर्त्यांची पार्टी आहे. कार्यकर्त्यांच्या मेहनतीने विश्वातील सर्वात मोठी पार्टी म्हणून मान मिळाला.तळागाळातील कार्यकर्ता प्रवाहात यावा म्हणून केंद्रीय नेतृत्व विविध अभियान राबवत आहे.पक्ष आणि संघटनेमुळे कार्यकर्ता मोठा होतो.एकनिष्ठ कार्यकर्त्यांना संघटनेच्या मोठ्या जबाबदाऱ्या दिला जातात.देशभरात अशी अनेक उदाहरणे आहेत. संघटनेचे ध्येय धोरण, विचारधारेला समर्पित होऊन कार्य करणाऱ्या एकनिष्ठ कार्यकर्त्याचा भाजपा सन्मान करून त्याला योग्य फळ देते असे विचार जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांनी मांडले.




ते भारतीय जनता पार्टी अर्जुनी मोरगाव आणि केसोरी मंडळाच्या विस्तारित बैठकीचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.भाजपा गोंदिया जिल्हाध्यक्ष सीताताई रहांगडाले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत माजी जिप अध्यक्ष पंकज रहांगडाले,प्रदेश महामंत्री रचना गहाणे,मंडळ अध्यक्ष राधेश्याम भेंडारकर, मंडळ अध्यक्ष प्रकाश गहाणे, जि प सदस्य जयश्री देशमुख, जिल्हा उपाध्यक्ष विजय कापगते,लक्ष्मीकांत धानगाये, संजय बारेवार,खरेदी विक्री सभापती केवळराम पुस्तोडे, उपसभापती संदीप कापगते,राज्य परिषद सदस्य डॉ. गजानन डोंगरवार, शिवनारायण पालीवाल, प्रदेश सदस्य चामेश्वर गहाणे उपस्थित होते.

यावेळी जिल्हाध्यक्ष रहांगडाले यांनी रक्षाबंधन कार्यक्रम, विभाजन विभिशीका दिवस,हर घर तिरंगा अभियान घरापर्यंत पोहचवा.आगामी निवडणुकामध्ये ५१ टक्के मते मिळिवण्यासाठी एकसंघ व्हा.केंद्र आणी राज्यसरकारच्या कल्याणकारी योजनाचा लाभ शेवटच्या घटकाला मिळवून द्या.२०४७ च्या विकसित भारताच्या पायाभरणीत आपले योगदान देण्याचे कार्यकर्त्यांना आवाहन केले.यावेळी रचना गहाने, पंकज रहांगडाले यांनी मार्गदर्शन केले.अर्जुनी मोरगाव आणि केशोरी मंडळाच्या नवीन कार्यकारिणीची घोषणा मंडळ अध्यक्षांनी केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकाश गहाणे, संचालन ओमप्रकाशसिंह पवार आणि आभार राधेश्याम भेडारकर यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महामंत्री लैलेश्वर शिवणकर, जयंत लांजेवार, भोजराज लोगडे, प्राणगोपाल दास, मुकेश जयस्वाल,पोमेश रामटेके,पराग कापगते, अश्विन गौतम,उमेश तवाडे, गीता ब्राह्मणकर,मीना शहारे, वनिता नशिने,मिनती सरकार, खोकन सरकार, गौरीशंकर अवचटे, काशिनाथ कापसे, मुरलीधर ठाकरे, रामदास कोहाडकर यांनी सहकार्य केले.

# ओबीसींच्या हक्क अधिकाराकरीता मंडल यात्रा-जि.प.सदस्य जगदिश बावनथडे

**तिरोडा:-**ओबीसी समाजाच्या विकासासाठी जातनिहाय जनगणना ही अत्यावश्यक असल्याचे तसेच ओबीसी विद्यार्थ्यांनी वसतिगृहाचा लाभ घ्यावा या मुख्य उद्देशाला घेऊन २ आँगस्टपासून ओबीसी युवा अधिकार मंचचे संयोजक उमेश कोराम व ओबीसी अधिकार मंचचे खेमेंद्र कटरे यांच्या नेतृत्वात निघालेल्या यात्रेचे तालुक्यातील डाकराम सुकडी येथे(दि.०६) स्वागत करण्यात आले.याप्रसंगी बोलतांना जिल्हा परिषद सदस्य जगदिश बावनथडे यांनी मंडल आयोगाने शेतकरी कामगार जातींचे ओबीसी अस्तित्व निर्माण केले आहे.परंतु अजूनही मंडल आयोगाच्या संपूर्ण शिफारशी लागू झालेल्या नाहीत,त्या लागू व्हावे व ओबीसींना हक्क अधिकार मिळावे याकरीता ही मंडल यात्रा असल्याचे सांगितले.



डाकराम सुकडी येथील जिल्हा परिषद कनिष्ठ महाविद्यालयात जिल्हा परिषद सदस्य जगदिश(बालू)बावनथडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मार्गदर्शन सभेला ओबीसी अधिकार मंचचे खेमेंद्र कटरे,कैलास भेलावे,ओबीसी युवा वक्ते निखिल बनसोड,ओबीसी सेवा संघाचे भुमेश ठाकरे,डॉ.पारधी,मंडल यात्रेतील सहकारी शंकर पाल, सुभाष उके,संविधान मैत्री संघाचे अतुल सतदेवे,सुनील मेश्राम,संदीप कुर्वे,हर्षवर्धन मेश्राम,जगदीश जांभुळकर,मगेझरी सरपंच छायाताई टेकाम,भोजराज उईके,विजय बिसेन,खुमेंद्र राहांगडाले,देवेंद्र चौधरी,दिनेश बिसेन, हिमानीताई बिसेन,चंद्रशेखर बिसेन,पौडकर सर, गोदे सर व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना उमेश कोराम यांनी ओबीसींची जातनिहाय जनगणना का महत्वाची आहे.अर्थसंकल्पात संख्याप्रमाण वाटा मिळत नाही तोपर्यंत ओबीसी,एसबीसी, व्हीजे एनटी समाजाच्या विकासाचा मार्ग मोकळा होणार नाही. म्हणून सर्वांनी मंडल ओबीसी आंदोलनात सहभागी व्हावे असे आवाहन करीत वसतिगृह, महाज्योती संस्थेच्या योजनांची माहिती दिली.ओबीसी वसतिगृहात प्रवेशाकरीता आपल्या भाऊ बहिणींपर्यंत माहिती पोचवून नीट,जेईईसारख्या अभ्यासक्रमाकरीता महाज्योती संस्थेकडे संपर्क साधण्याचे आवाहन केले.यावेळी खेमेंद्र कटरे यांनीही वसतिगृहाकरीताच्या लढ्यात सहभागी होण्याचे आवाहन केले.त्यांनतर ही यात्रा ठाणेगावकडे रवाना झाली.

# शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्यासाठी नितेश खोब्रागडे व शेतकऱ्यांचे १४ ऑगस्टपासून आंदोलन

**तिरोडा:-**राज्यभरातील शेतकरी आणि शेतमजुरांच्या रास्त मागण्यांकडे शासन सातत्याने दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करत,शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्यासाठी नितेश खोब्रागडे व शेतकऱ्यांनी १४ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजेपासून गोंदिया जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्याचा इशारा शासनाला दिला आहे.निवेदनात शासन आणि प्रशासनाच्या उदासीनतेमुळे शेतकऱ्यांच्या अनेक अडचणी वाढल्या असून, शेतकऱ्यांना जिवन जगणे कठीण झाले आहे.शासनाच्या चुकीच्या धोरणांमुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या खचून गेलेला आहे. यासाठी शासनाने छत्तीसगड राज्याप्रमाणे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या ठोकळ ( मोठ्या)धानाला प्रति क्विंटल ३,१०० रुपये भाव द्यावा आणि एकरी २० क्विंटल धान खरेदीची मर्यादा वाढवावी.ही प्रमुख मागणी असून जोपर्यंत हा निर्णय लागू होत नाही, तोपर्यंत उपोषण सुरूच राहील असे नमुद केले आहे.



त्याचप्रमाणे वाणांनुसार प्रति क्विंटल ५,००० ते ७,००० रुपये दर जाहीर करावा,शेतीकामासाठी रोजगार हमी योजनेतून एकरी १५,००० रुपयांचे अनुदान द्यावे.शेतीसाठी २४ तास मोफत वीज आणि सिंचनासाठी मोफत पाणीपुरवठा करावा.शेतकरी व शेतमजूर कुटुंबांना १० लाख रुपयांचे आरोग्य विमा कवच आणि मुलामुलींना उच्च शिक्षणापर्यंत संपूर्ण मोफत शिक्षण द्यावे,धान खरेदी केंद्रांवरील मर्यादा (लिमिट) काढून टाकावी, वर्षभर खरेदी सुरू ठेवावी आणि विक्री केलेल्या धानाची रक्कम ७ दिवसांच्या आत खात्यावर जमा करावेत, शेतकऱ्यांसाठी बिनव्याजी वाहन कर्ज, भारतभर मोफत एस.टी. व रेल्वे प्रवास, शेतकऱ्यांच्या शेतावर जाणाऱ्या शेतरस्त्यांची निर्मिती करावी.शासनाने १४ ऑगस्ट २०२५ पर्यंत या मागण्या मान्य न केल्यास, उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागेल अशी तंबी नितेश खोब्रागडे यांनी लेखी निवेदनाद्वारे कळिवले आहे.

# तीन राज्यांना जोडणाऱ्या रस्त्याची दयनिय अवस्था!






**सालेकसा :-** महाराष्ट्राच्या पूर्वेकडील टोकावर असलेला आमगाव-सालेकसा-चांदसूरज राज्य महामार्ग क्रमांक ३३५ हा महाराष्ट्र, मध्यप्रदेश व छत्तीसगड या तीन राज्यांना जोडणारा अत्यंत महत्त्वाचा मार्ग आहे. मात्र, या मार्गाची दयनीय अवस्था झाली आहे. त्यामुळे नागरिकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. दररोज अपघात होत असून अनेकांनी या मार्गावर जीव गमावला आहे. तरी देखील या मार्गाची दुरूस्तीकडे प्रशासन जनप्रतिनिधी सतत दुर्लक्ष करीत आहेत. यामुळे संताप व्यक्त केला जात आहे. दहा दिवसात रस्त्याची दुरूस्ती करण्यात आली नाही तर तीव्र आंदोलन करणार, असा इशारा राष्ट्रवादीच्या वतीने देण्यात आला आहे.

**या मार्गाच्या पुनर्निर्माणासाठी अनेकदा सार्वजनिक बांधकाम विभाग, आमदार, खासदार यांच्याकडे पाठपुरावा केला आहे. मात्र प्रत्येक वेळी हे राज्य शासनाच्या अखत्यारित असल्याचे सांगून जबाबदारी झटकली जाते. आता १० दिवसांत काहीच कार्यवाही झाली नाही, तर आम्ही तीव्र आंदोलन छेडणार.**

**- छायाताई नागपुरे, अध्यक्ष, सडक संघर्ष कृती समिती सालेकसा व सदस्य जि.प.गोंदिया**

सालेकसा ही आदिवासी बहुल, नक्षलग्रस्त, दुर्गम आणि संवेदनशील तालुका म्हणून ओळख जातो. दुर्गम भागात नागरी सुविधा पोहोचवणे ही सरकारची जबाबदारी आहे. मात्र, आमगाव-सालेकसा मार्गावरील वाघ नदीवरील जुना पूल देखील अतिशय धोकादायक स्थितीत आहे.

पुलावरून वाहनांची वाहतूक थांबवण्यासाठी दोन्ही बाजूंनी बॅरिकेड्स लावण्यात आले असून, एसटी बससेवाही पूर्णतः बंद झाली आहे. आमगाव ते चांदसूरज दरम्यान अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. हजारफाल घाट ते गणेश मंदिर उतरत्या दरम्यानचा रस्ता अत्यंत खराब झाला आहे.

झलिया ते पानगावपर्यंतचा भाग तर अक्षरशः वाहनचालकांसाठी संकट बनला आहे. यामुळे या मार्गावरून प्रवास करणे अत्यंत कठीण झाले आहे. ही समस्या मागील वर्षापासून वर्षापासून कायम आहे. आमदार, खासदार आणि सरकारे बदलली, मात्र या रस्त्याकडे कोणीही लक्ष दिले नाही. त्यामुळे जीव मुठीत प्रवास करणे परिसरातील नागरिकांच्या नशिबाचे भाग झाले आहे, असेच म्हणण्याची वेळ आली आहे. याकडे लक्ष देवून रस्त्यावरील खड्डे तात्काळ बुजवून रस्त्याची सुधारणा करण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस व सडक संघर्ष कृती समिती, सालेकसा यांच्या वतीने करण्यात आली आहे. अन्यथा आंदोलन करणार, असाही इशारा देण्यात आला आहे.

### उपविभागीय अभियंतांना निवेदन

रस्त्याच्या समस्येला घेवून जिल्हा परिषद सदस्या छाया नागपुरे यांच्या नेतृत्वात सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता आमगाव यांना निवेदन देण्यात आले आहे. आगामी १० दिवसांच्या आत रस्त्याची दुरूस्ती न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. यावेळी सुनील असाटी, मायकल मेश्राम, दिपक देशकर, प्रदीप नागपुरे, अनिल महारवाडे, शैलेश पटले, समीर बिसेन, डिलेश मेंढे, प्रवीण देशकर, कुणाल पाथोडे, पंकज भेडे आदी उपस्थित होते. तर दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सालेकसा शहराच्या वतीने अध्यक्ष ब्रिजभूषण बैस यांच्या नेतृत्वात गोंदिया येथील मुख्य अभियंता यांना निवेदन देण्यात आले. यावेळी डॉ.हिरालाल साठवणे, बाजीराव तरोने यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

### हाजराफाल पर्यटनस्थळ व काशी कचारगड यात्रेस धोका

रस्त्यावर पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले हजारफाल धबधबा व काशी कचारगड हे स्थळ आहे. हाजराफाल पाहण्यासाठी विदर्भातून पर्यटक येत असतात, तर कचारगड यात्रेसाठी दरवर्षी फेब्रुवारीमध्ये लाखो आदिवासी श्रद्धाळू महाराष्ट्रासह मध्यप्रदेश, छत्तीसगडमधून येतात. मात्र रस्त्याची अवस्था बघता, या भागातील पर्यटन व धार्मिक प्रवासावर मोठा परिणाम होत आहे.

# पीक कर्जवाटपात राष्ट्रीयीकृत बँकांची दिरंगाई

**गोंदिया :-** सरकार शेतकऱ्यांना समृद्ध, सक्षम आणि स्वावलंबी करण्यासाठी सर्व स्तरांवर प्रयत्नशील आहे; तर दुसरीकडे राष्ट्रीयीकृत बँकांकडून वेळेवर कर्ज न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांना पीक कर्ज घेणे कठीण होत आहे. पीक कर्ज वाटपात राष्ट्रीयीकृत बँकांची कामगिरी फारच सुमार आहे. परिणामी शेतकऱ्यांना वारंवार पायपीट करावी लागत आहे. यावर आमदार विनोद अग्रवाल यांनी नाराजी व्यक्त करीत राष्ट्रीय बँकेच्या अधिकाऱ्यांचे कान टोचत पीक कर्जवाटपाचे उद्दिष्ट वेळेत पूर्ण करण्यास सांगितले.




स्थानिक पंचायत समिती येथे ४ ऑगस्ट रोजी शेतकऱ्यांना पीक कर्जाच्या वाटपाचा आढावा घेण्यासाठी सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाची संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत ते बोलत होते. आमदार विनोद अग्रवाल यांनी गोंदिया तालुक्यातील को ऑपरेटिव्ह सोसायट्या, ग्रामीण बँक व राष्ट्रीयीकृत बँकांच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून त्यांनी वाटप केलेल्या पीक कर्ज वितरणाची माहिती घेतली. यात ग्रामीण बँक वगळता इतर राष्ट्रीयीकृत बँकांनी दिलेल्या उद्दिष्टांपैकी केवळ १० टक्के कर्जच शेतकऱ्यांना वितरित केल्याचे पुढे आले. यावर आमदार अग्रवाल यांनी अधिकाऱ्यांना चांगलेच फटकारले. तसेच निर्धारित कालावधीत पीक कर्जवाटपाचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचे निर्देश दिले. सेवा सहकारी सोसायट्यांचे जे शेअर्स बँकेत ठेवले जात होते, ते आता सोसायट्यांमध्येच ठेवले राहणार असल्याचे सांगितले. जिल्हा

मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष आणि पदाधिकाऱ्यांशी चर्चा झाली असून, ते लवकरच होणाऱ्या पहिल्या सर्वसाधारण सभेत हा प्रस्ताव मंजूर करतील. सोसायटी आणि बँक यांच्या नोंदींमध्ये येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठीसुद्धा बँकेला सूचना करण्यात आल्या आल्या आहेत. जीडीसीसी बँक यावर सकारात्मक पावले उचलेल. तसेच नवीन सभासदांचे प्रस्ताव मंजूर करण्याचे निर्देशही अधिकाऱ्यांना देण्यात आले. आढावा बैठकीला पंचायत समितीचे सभापती मुनेश रहांगडाले, सहकारी संस्थांचे सहायक निबंधक रोकडे, पंचायत समितीचे खंडविकास अधिकारी पिंगळे, एपीएमसीचे संचालक ठाकूर, पंचायत समितीचे सदस्य शंकर टेंभरे, ववीर इनायत उपस्थित होते.